सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. २३ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ८१ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## ऑपरेशन सिंधू : आतापर्यंत १११७ भारतीय मायदेशी

### परराष्ट्र मंत्रालयाचे रणधीर जयस्वाल यांनी दिली माहिती

नवी दिल्ली, २२ जून : इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांच्या सुटकेसाठी ऑपरेशन सिंधू राबवण्यात येतेय. यातंर्गत आतापर्यंत १११७ भारतीय नागरिक मायदेशी परतले आहेत. उर्वरित लोकांना देखील आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ट्विट करत दिली.

ऑपरेशन सिंधू अंतर्गत पहिल्या टप्प्यात इराणमधून ११० भारतीय विद्यार्थी सुरक्षितपणे मायदेशी परतले. या विद्यार्थ्यांना विशेष विमानाने मायदेशी परत आणण्यात आले. त्यानंतर २० जून रोजी २९० भारतीय नागरिकांना मायदेशी परत आणले गेले. तर, शनिवारी २१ जून रोजी पहाटे ११७ भारतीयांना घेऊन विशेष विमान डेरेदाखल झाले. तर दुपारी ४.३० वाजता इराणमधून ३१० भारतीय नागरिकांना घेऊन नवी दिल्लीत एक विमान दाखल झाले. तसेच शनिवारी रात्री २९० भारतीयांना घेऊन तिसरे विमान भारतात पोहचले. त्यामुळे ऑपरेशन सिंधू अंतर्गत बाहेर काढण्यात आलेल्या लोकांची एकूण संख्या १११७ झाली आहे. सध्या सुरू असलेल्या ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधून बाहेर काढण्यात आलेल्या भारतीयांची ही पाचवी तुकडी आहे.

ऑपरेशन सिंधू अंतर्गत एका विशेष विमानाने इराणहून भारतात आलेल्या भारतीय नागरिकाने सांगितले की ते खूप चांगले वाटत आहे. तिथे क्षेपणास्त्रे डागली जात होती. आम्हाला भीती वाटली. आम्ही एक आठवडा तिथे अडकलो होतो.

# एकनाथ शिंदे यांनी साधला स्थानिक काश्मीरी नागरिकांशी संवाद



सोनमर्ग, २२ जून : ऑपरेशन विजयचा २६वा विजयोत्सव साजरा करण्यासाठी सध्या कारगिल दौऱ्यावर असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोनमर्ग येथे आपला ताफा थांबवून स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

कारगिल मध्ये आयोजित सरहद शौर्यथॉन २०२५ या स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी ते कारगिलमधील द्रास येथे उपस्थित राहणार आहेत. श्रीनगरहुन द्रासकडे जात असताना त्यांनी वाटेत उतरून त्यांनी येथील परिस्थिती स्थानिकांकडून जाणून घेतली.

पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सगळ्यात मोठा फटका हा काश्मीरमधील पर्यटनाला बसला होता. अशात शिंदे यांनी स्थानिक नागरिक, घोडेवाले, फळ विक्रेते इथे फिरायला आलेले पर्यटक यांच्याशी संवाद साधून येथील परिस्थिती विचारली. यावेळी येथील दुकानदारांनी हळूहळू येथील परिस्थिती सामान्य होत असून पर्यटकांची पाऊले पुन्हा काश्मीरकडे वळू लागल्याचे सांगितले. तर इथे आलेल्या पर्यटकांनीही येथील वातावरण आता आम्हाला पूर्वीप्रमाणे सुरक्षित वाटत असून देशाचे हे नंदनवन पाहताना कोणतीही भीती वाटत नसल्याचे मत व्यक्त केले. यावेळी काश्मीरच्या थंडगार वातावरणात स्थानिक कणीस विक्रेत्याकडून कणीस विकत घेत शिंदे यांनी या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद लुटला. पहलगाम हल्ल्यानंतर स्थानिकही आतंकवाद्यांशी सामील असल्याचा अपप्रचार मोठ्या प्रमाणात करण्यात आला होता. मात्र उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या काश्मीर दौऱ्यात स्थानिकांशी संवाद साधत हा दुरावा कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न यानिमित्ताने केलाय.

## पंतप्रधान मोदींची इराणच्या राष्ट्रध्यक्षांची फोनवरुन चर्चा



नवी दिल्ली, २२ जून : इस्रायल आणि इराणमध्ये जोरदार संघर्ष सुरु आहे. आज सकाळी अमेरिकेने इराणच्या अणुस्थळांवर हल्ला केला. अमेरिकेच्या या कारवाईनंतर जगात खळबळ उडाली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्राध्यक्ष पजशिक्यान यांच्याशी फोनवरून संवाद साधला आणि इराण आणि इस्रायल संघर्षावर चिंता व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोशल मीडियीच्या माध्यमातून लिहिले आहे की, मी इराणचे राष्ट्राध्यक्ष पजशिकयान यांच्याशी बोललो आहे. आम्ही या प्रदेशातील सध्याच्या परिस्थितीवर सविस्तर चर्चा केली आणि वाढत्या तणावाबद्दल तीव्र चिंता देखील व्यक्त केली आहे. मी तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि राजनैतिक कूटनीतिला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. तसेच शांतता, सुरक्षा आणि स्थिरतेची गरज यावर भर दिला आहे. अमेरिकेने फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या इराणच्या तिन्ही अणुस्थळांवर हल्ला केला होता. १३ जूनच्या सकाळपासून इस्रायलने इराणविरुद्ध मोर्चा उघडला आहे.

# नाशिक : द्वारका येथे बनणार उड्डाणपूल

### आ. फरांदे, मुख्यमंत्री व गडकरींच्या बैठकीत झाला निर्णय



नाशिक, २२ जून : नाशिकच्या द्वारका चौक येथील उड्डाण पुलाबाबत तसेच द्वारका सर्कल येथील वाहतूक कोंडीबाबत केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. या परिसराचा अभ्यास करून उड्डाणपूल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे . २०२७ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. सिंहस्थाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग संदर्भात करावयाच्या सुधारणांच्या बाबत नागपूर येथील मुख्यमंत्री सचिवालय येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीला केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे जलसंपदा मंत्री व सिंहस्थ मंत्री गिरीशजी महाजन, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले , आमदार देवयानी फरांदे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार देवयानी फरांदे यांनी आगामी सिंहस्थापूर्वी द्वारका येथील उड्डाणपुलाचे काम करणे गरजेचे आहे असे नमूद केले. केंद्रीय परिवहन मंत्री नितीनजी गडकरी यांनी यावेळी उपस्थित असणारे एम एस आर डी सी चे मुख्य कार्यकारी अधिकारी दीक्षित व मुख्य अभियंता हांडे यांना द्वारका सर्कलचा अभ्यास करू करंबोळीच्या धरतीवर फुल तयार करण्याचे आदेश दिले. तसेच औरंगाबाद कडे जाण्यासाठी द्वारका सर्कलच्या अलीकडे एक्झिट दिले आहे. त्यानंतर कुठेही एक्झिट दिलेले नाही त्यामुळे औरंगाबाद कडे जाणारी सर्व वाहतूक ही द्वारका सर्कल मार्गे जाते त्यामुळे औरंगाबाद कडे जाण्यासाठी व औरंगाबादहून येणाऱ्या वाहनांसाठी द्वारका सर्कल नंतर औरंगाबाद नाक्यापर्यंत उड्डाणपुलावर चढण्यासाठी व उतरण्यासाठी नवीन मार्ग करण्याची मागणी आमदार देवयानी फरांदे यांनी केली. तसेच द्वारका येथील अंडरपास पदचारी मार्ग हे कोणत्याही प्रकारच्या उपयोगाचे नसल्याने ते बंद करण्याची मागणी केली. . राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी ढगे यांना याबाबत पाहणी करून अहवाल देण्याचे आदेश नितीनजी गडकरी यांनी दिले. यावेळी नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री , महानगरपालिका शहर अभियंता अग्रवाल आदींसह मोठ्या प्रमाणावर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या दोघांना अटक

नवी दिल्ली, २२ जून : जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या हल्ल्यातील दहशतवाद्यांना आश्रय दिल्याच्या आरोपाखाली राष्ट्रीय तपास संस्था अर्थातच एनआयएने दोन स्थानिक रहिवाशांना अटक केली आहे.एनआयएनेअनेक स्थानिक प्रत्यक्षदर्शींची चौकशी केल्यानंतर ही अटक करण्यात आली आहे. ज्यामध्ये २००० हून अधिक लोकांची चौकशी करण्यात आली आहे. चौकशी केलेल्या काही लोकांवर सार्वजनिक सुरक्षा कायद्याअंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एएनआय, नवी दिल्ली. परवेझ अहमद आणि बशीर अहमद अशी अटक केलेल्या या दोन आरोपींची नावे आहेत. अटक करण्यात आलेले दोघेही पहलगामचे रहिवासी आहेत.

## ब्रिटीश एअरवेजचे विमान चेन्नईला परतले

### युद्धामुळे मध्यपूर्वेतील हवाईक्षेत्र अचानक बंद



चेन्नई, २२ जून : अमेरिकेने इराणवर केलेल्या लष्करी कारवाईनंतर मध्यपूर्वेतील हवाई क्षेत्र अचानक बंद जाले. त्यामुळे लंडनला जाणाऱ्या ब्रिटीश एअरवेजच्या विमानाला आज, रविवार चेन्नई विमानतळावर आपातत्कालीन परिस्थीतीत परतावे लागले.

ब्रिटीश एअरवेजचे विमान (फ्लाइट बीए-२७६) चेन्नईहून सकाळी ६.२४ वाजता लंडनला जाण्यासाठई निघाले. हे विमान त्याच्या नियोजित वेळेनुसार सकाळी ५.३५ वाजता सुमारे एक तास मागे होते. या विमानात २४७ प्रवासी आणि १५ कर्मचारी होते. विमानाने बेंगळुरू ओलांडल्यानंतर अरबी समुद्रावरून उड्डाण करत असताना पायलटला मध्य पूर्वेतील हवाई क्षेत्राचे प्रमुख भाग बंद असल्याची तातडीची सूचना मिळाली, ज्यामुळे लंडनला जाणारा नियोजित उड्डाण मार्ग दुर्गम झाला. अमेरिकेच्या लष्कराने रात्रीच्या वेळी इराणी लक्ष्यांवर केलेल्या हल्ल्यांनंतर हवाई क्षेत्र बंद करण्याची बातमी आली. त्यानंतर प्रादेशिक अधिकाऱ्यांनी खबरदारी म्हणून नागरी उड्डाणे ग्राउंड केली. सूचना मिळताच, विमान कर्मचाऱ्यांनी ताबडतोब चेन्नई आणि लंडन हवाई वाहतूक नियंत्रण केंद्रांशी संपर्क साधला. अधिकाऱ्यांनी विमानाला चेन्नईला परतण्याचे निर्देश दिले.

विमान सकाळी १० वाजता चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे उतरले. विमानात बसलेले सर्व २६२ लोक सुरक्षित आहेत. या विमानातील प्रवाशांची लाउंज आणि जवळच्या हॉटेल्समध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रादेशिक हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे चेन्नईहून आखाती देशांना जाणाऱ्या अनेक विमानांनाही विलंब झाला आहे. कुवेत, दोहा, दुबई, शारजाह आणि अबू धाबीला जाणाऱ्या विमानांना विलंब झाल्याचे दिसून आले. कुवेत एअरवेजचे पहाटे ३.३० वाजता नियोजित असलेले विमान पहाटे ५.४० वाजता निघाले. त्याचप्रमाणे, दोहाला जाणारे कतार एअरवेजचे विमान आणि दुबईला जाणारे एमिरेट्सचे विमान सुमारे एक तास उशिराने निघाले.

# ट्रम्पची नोबेलसाठी शिफारस यासाठीच केली होती का...?

### पाकिस्तानवर खासदार ओवैसी यांची घणाघाती टीका



हैदराबाद, २२ जून : अमेरिकेने इराणच्या ३ अणु प्रकल्पांवर केकेल्या बॉम्ब हल्ल्यानंतर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे (एआयएमआयएम) प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी पाकिस्तानवर जोरदार टीका केली आहे. पाकिस्ताननेचे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची नोबेल शांतता पुरस्कारासाठी शिफरास केली होती. त्यावरून ओवैसींनी पाकिस्तानला टोला लगावला. ट्रम्पच्या नावाची शिफारस यासाठीच केली होती का...? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

इस्राईल आणि ईरान यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या हस्तक्षेपावर ओवैसी म्हणाले की, हेच कारण होतं का की पाकिस्तानने ट्रम्पसाठी शांतता पुरस्काराची शिफारस केली ? आणि याच कारणासाठी का पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत लंच केला होता ? आज हे सगळे उघडे पडले आहेत. असे ओवैसी म्हणालेत. अमेरिकेचे धोरण फक्त इस्रायली सरकारचे गुन्हे लपवण्याचे आहे. गाझामध्ये नरसंहार सुरु आहे. याबाबत कोणीही बोलत नाही. इस्रायलकडे किती अणुबॉम्ब आहेत हे कोणी का विचारत नाही ? अमेरिकेने इराणमधील तीन-चार ठिकाणी बॉम्बस्फोट केल्याने त्यांना रोखता येणार नाही. पुढील ५ ते १० वर्षांत इराण देखील ते करेल, इतर देश देखील ते करतील कारण आता त्यांना हे समजले आहे की अणुबॉम्ब असणे हाच इस्रायलच्या वर्चस्वाविरुद्धचा एकमेव प्रतिबंध आहे. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय कायद्याचे आणि संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे उल्लंघन केले आहे.

## इराणवरील हल्ल्यानंतर इस्रायलच्या पंतप्रधानांनी ट्रम्प यांचे मानले आभार

जेरुसलेम , २२ जून : इराण आणि इस्रायल युद्धात आता अमेरिकेनेही उडी घेतली आहे. इस्रायलने मदत मागितल्यानंतर अमेरिकेने इराणवर हल्ला केला आहे. या हल्ल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे आभार मानले आहेत.

अमेरिकेने केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कौतुक केले आहे. अमेरिकेने ताकदीने काम केले आहे आणि शांतता प्रस्थापित करण्याचा हाच खरा मार्ग आहे, असं बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटलं आहे.

अमेरिका खरोखरच अद्वितीय आहे. त्यांनी असं काही केलं आहे जे पृथ्वीवरील इतर कोणताही देश करू शकत नाही. इतिहासात नोंद आहे की राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जगातील सर्वात धोकादायक राजवट, जगातील सर्वात धोकादायक शस्त्रे संपवण्याचे काम केले, असं नेतन्याहू यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटलं. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि मी नेहमी म्हणतो की,'शांतता शक्तीतून येते. आधी ताकद दाखवली जाते, नंतर शांतता येते,' आज रात्री, ट्रम्प आणि अमेरिकेने पूर्ण ताकदीने त्यांचे काम केले आहे, असं म्हणत नेतन्याहू यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे लष्करी कारवाईबद्दल अभिनंदन केले आणि त्यांचे आभार मानले. अमेरिकेने इराणच्या तीन अणुऊर्जा केंद्रावर हल्ला केल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. अमेरिकन सैन्याने इराणमधील फोर्डो, नतान्झ आणि एस्फहान या तीन अणुस्थळांवर यशस्वी हल्ला केला असून सर्व विमान सुरक्षितपणे इराणच्या हद्दीतून बाहेर पडली आणि आपापल्या ठिकाणी पोहचल्याचे ट्रम्प म्हणाले.

## फडणवीसच पुढची १०० वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा - नितेश राणे

मुंबई, २२ जून - सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अत्यंत सक्षम असून, ते पुढील १०० वर्षे मुख्यमंत्री राहावेत, अशी आमची इच्छा आहे, अशा शब्दांत राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मुख्यमंत्र्यांच्या कामाचे कौतुक केले.त्याचबरोबर, महायुती सरकार शेतकऱ्यांच्या धर्तीवर मच्छीमारांनाही १०० टक्के नुकसान भरपाई देण्याबाबत सकारात्मक विचार करत असल्याचे महत्त्वपूर्ण आश्वासन त्यांनी दिले. ते आज (दि.२२) वर्सोवा येथे येथील मच्छीमार प्रशिक्षण केंद्र, बर्फ कारखाना आणि वर्सोवा खाडीला भेट देताना बोलत होते.

नितेश राणे यांनी आज(दि.२२) वर्सोवा येथील कोळी बांधवांसोबत त्यांनी मार्केटलाही भेट दिली. यावेळी, बोलताना नितेश राणे म्हणाले की, मी राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून आलेलो आहे. आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे १०० वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्लाच नितेश राणेंनी येथील कोळी बांधवांना दिला आहे. मी गुजरातवरुन थेट तुमचे आशीर्वाद घ्यायला आलो आहे. आता कोणीतीही चिंता करू नका जास्तीत जास्त नुकसान भरपाई देऊ, असे म्हणत मध्ये मध्ये बोलणाऱ्यांना नितेश राणेंनी यावेळी झापले.






# सह्याद्री हॉस्पिटल येथे आनंद अनुभूती शिबिर संपन्न



हिंगोली : शहरातील सह्याद्री हॉस्पिटल येथील हॉलमध्ये १७ जून ते २२ जून पर्यंत आनंद अनुभूती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. योग साधना सत्संग व सेवा कार्यक्रम अंतर्गत शहरातील डॉ.यशवंत पवार यांच्या सह्याद्री हॉस्पिटल मागील चार वर्षापासून योग साधना सत्संग सेवा अंतर्गत आनंद अनुभूती शिबिर घेण्यात येत असते.

१७ जून ते २२ जून या दरम्यानही सह्याद्री हॉस्पिटल येथील हॉलमध्ये आनंद अनुभूती शिबिर घेण्यात आले.यावेळी प्रशिक्षक शामकांत पजई, सौ. सुनिताताई पजई, प्रज्ञेश पोळ,नरेंद्र रत्नपारखी,प्रणव देशमुख, यश डहाळे , मोतीराम इंगोले,डॉ.यशवंत पवार, महेश सरनाईक, निलेश अग्रवाल, रूपाली माळोदे आदींची उपस्थिती होती. याशिबिरा अंतर्गत आतापर्यंत शेकडो नागरिकांनी आनंद अनुभुती शिबिरात आपल्या जीवनात आनंद घेतला आहे. या शिबिरात आलेल्या महिला पुरुषांना योगा, प्राणायाम, तसेच आपल्या आरोग्याबदल माहिती देवून त्यांच्या जीवनात कशा आनंद घेता येईल याचे मार्गदर्शन करण्यात आले. रोजच्या धाकधकीच्या जीवनात मानसीक ,शारीरीक, दुष्ट्या कसे मजबूत वायचे याचे प्रशिक्षण देण्यात येते.

यावेळी डॉ.यशवंत पवार यांनी असे सांगितले कि आनंद अनुभुती शिबिरात महिला, पुरूष, मुल मुली यांना आपल्या जीवनात कसे आनंदी राहायचे हे तीन तासाच्या शिबिरात शिकवल्या जाते. या पूढे घेण्यात येणाऱ्या आनंद अनुभुती शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा .

## श्री कसबा गणपती सामाजिक संस्थेने घेतले १२५ विद्यार्थी दत्तक

पुणे, २२ जून : पुणे शहराचा मानाचा पहिला श्री कसबा गणपती आणि श्री कसबा गणपती सामाजिक संस्थेतर्फे गरजू विद्यार्थ्यांना दत्तक योजना गेले २२ वर्षे राबवण्यात येते. या योजनेअंतर्गत वर्ष २०२५ मध्ये १२५ विद्यार्थ्यांना दत्तक घेतले असून या विद्यार्थ्यांची शैक्षणिक मदत या निधीतून पूर्ण केली जाते. हा कार्यक्रम पुण्यात नुकताच संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमात १२५ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क आणि स्टेशनरीचे वाटप करण्यात आले. यात पुण्यातील रमणबाग, हुजूरपागा, अहिल्यादेवी आणि विमलाबाई गरवारे अशा अनेक नामवंत शाळांमधील विद्यार्थ्यांना मदत करण्यात आली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सुप्रभात ग्रुपच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
लातूर शहरातील सुप्रभात ग्रुपच्या वतीने शनिवारी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुप्रभात ग्रुपचे अध्यक्ष मोहन रासुरे , सचिव दत्तात्रय स्वामी बसपूरे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

सुप्रभात ग्रुपच्या सर्व सदस्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



यावेळी योगगुरू सिद्रामप्पा वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित सदस्यांनी योगासन - प्राणायाम करून निरोगी जीवनाचा संकल्प केला.

याप्रसंगी लातूर शहर मनपाचे स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, कलीम शेख यांचीही विशेष उपस्थिती होती. या उपक्रमात सुप्रभात ग्रुपचे शिवशंकर सुरवसे, राजू मस्के, शिवाप्पा टेंकाळे , काशिनाथ वंजारे, बाबा गायकवाड, श्रीधर चापोलीकर, गोविंद कावळे, भीमराव बोयणे , सूर्यकांत गड्डे, बाबुराव पाचंगे, राजाभाऊ खेकडे, नागनाथ काकनाळे, महिंद्रकर आदी मान्यवर सहभागी झाले होते.



### संक्षिप्त वृत्त...

## लातूर जिल्हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
लातूर जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात आले.

शिक्षकेतर भरती प्रक्रियेबाबत निर्गमित झालेले परिपत्रक तत्काळ रद्द करावे, माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षांचा दुसरा लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावा, माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी बक्षी समितीने शिफारस केल्याप्रमाणे नवीन सुधारित आश्वासित प्रगत योजनेचा लाभ द्यावा, माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक पदासाठी पात्र असणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांना पवित्र प्रणालीतून विनाअट पदावर वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यात यावी, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने न भरता ती पूर्वीप्रमाणे शासन नियुक्ती मान्यता प्राप्त असावी आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विभागीय कार्याध्यक्ष राजेश्वर चापुले, जिल्हाध्यक्ष अमोल चामे, अनिल दरेकर, पांडुरंग देडे, अजय आरदवाड, जगन्नाथ येमले, पांडुरंग चिंचोलकर, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, मराठवाडा शिक्षक संघटनेचे नेते विश्वंभर भोसले, व्यंकट गायकवाड, बी. एन. वंगाटे, अमोल घुमाडे, कुलदीप आर्य, विनोद मलशेट्टे आदी शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक सहभागी झाले होते. मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
संपूर्ण विश्वात २०१५ पासून योगाचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उद्देशाने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो, त्याचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अवंतीनगर येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात योग शिक्षक हरिदास कोयले व भरत सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांकडून योगाभ्यास करून घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांची माहिती देत प्राणायाम, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन या आसनासह सूक्ष्म क्रियाचे प्रात्यक्षिके करून दाखवली.

मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना ,योगाचे दैनंदिन जीवनातील महत्व पटवून देत योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. योग हा आपल्या देशाचा समृद्ध सांस्कृतिक ठेवा असून, निरोगी आयुष्यासाठी प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करावा, योगामुळे मनःशांती मिळते, शरीर निरोगी राहते आणि आत्मविश्वास वाढतो.

असे या प्रसंगी सांगितले, या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होत योगाचे विविध प्रकार करत योगदिन साजरा केला.

## सरस्वती विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
कुमठा बुद्रुक येथील सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस, आंतरराष्ट्रीय संगीत दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक एम. यु.सय्यद हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक बी. एस.पटवारी, पर्यवेक्षक ए. पी. राठोड, योग मार्गदर्शक व गणित विभाग प्रमुख एस.जी. पाटील, एस. व्ही. बोरसुरीकर, एस. बी.मुंडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी गुरु प्रार्थना, राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, संविधान सादर झाले. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांकडून उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष व पाहुण्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. याप्रसंगी गणित विभाग प्रमुख व योग मार्गदर्शक एस. जी.पाटील यांनी मानवी जीवनातील व्यायाम, प्राणायाम, आसन, ध्यानधारणा यांचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले व सर्व विद्यार्थ्यांकडून सूर्यनमस्कार, आसन,योगासन,प्राणायाम, यांची सुंदर प्रात्यक्षिकेही करून घेतली. याप्रसंगी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक एम.यु. सय्यद यांनी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख यु. आर.कांबळे यांनी केला.

# दोन सराईतांना अटक; सहा टी.व्ही. जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका गोदामातील एलईडी टी. व्ही. चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारांना शुक्रवारी रात्री अटक करून २ लाख ४० हजार रुपयांच्या सहा एलईडी टी. व्ही. जप्त केल्या.

शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इलेक्ट्रॉनिक साहित्याचे गोदाम फोडून गोदामातील ४३ इंचीच्या सहा एलईडी टी.व्ही. चोरीला गेल्याची घटना घडली. या घटनेत एकूण २ लाख ४० हजारांचे साहित्य चोरीला गेले होते. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस



अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक या गुन्ह्याचा तपास करत होते.

दरम्यान, सदर गुन्ह्यातील एलईडी टी.व्ही.सह दोन सराईत गुन्हेगार लातूर ते बार्शी जाणाऱ्या रोडवरील ब्रिजच्या बाजूला असलेल्या एका भंगार दुकानात थांबले आहेत, अशी माहिती मिळाली. पथकाने तत्काळ त्या ठिकाणी पोहोचून दोन संशयित जलील बशीर शेख (वय ३८, रा. म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर) आणि शंकर शिवाजी मोरे (वय ३४, रा. लक्ष्मी कॉलनी, पाखरसांगवी, ता. लातूर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे असलेल्या टी.व्ही. संदर्भात विचारपूस केली असता, त्यांनी सदर गुन्ह्यांची कबुली दिली. पथकाने त्यांच्याकडे असलेल्या चोरीच्या २ लाख ४० हजार रुपये किमतीच्या सहा एलईडी टी.व्ही. जप्त केल्या. आरोपींना पुढील तपासासाठी एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, तपास सहायक पोलीस निरीक्षक सानप हे करत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार संजय कांबळे, योगेश गायकवाड, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, व्यंकटेश निटुरे यांनी ही सेवा बजावली.

## सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजचे माजी विद्यार्थी मंगेश झोले यांची लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल शनिवारी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



मंगेश झोले यांनी २००८ ला राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजमधून शिक्षण घेतले. त्यांची नुकतीच लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्याच्या सहाय्यक कामगार आयुक्त पदी नियुक्ती झाली आहे. शनिवारी त्यांनी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलास सदिच्छा भेट दिली असता, त्यांचा संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कामाजी बिरादार, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींमुळे भारतीय योगाला जगात मान्यता : आ. संभाजी पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
जगभरात २१ जून हा योग दिन म्हणून साजरा केला जातो. आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे व ती टिकविण्यासाठी योगा किती महत्त्वाचा आहे, याची जाणीव सगळ्या जगाला करून देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

त्यांच्यामुळेच भारतीय योगाला आज जगात मान्यता मिळाल्याचे सांगताना फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर्स डे, फ्रेंड्स डे, परकीय संस्कृतीपेक्षा योगा ही भारतीय संस्कृती महान असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी भाजपा शहर जिल्हा व ग्रामीण, जेएसपीएम संस्था, पतंजलि योग समिती व आर्षयोग प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन विवेकानंदपूरम शैक्षणिक संकुल येथे आयोजित योगा कार्यक्रमात बोलताना केले. यावेळी भाजपा नेते शिवाजीराव पाटील कव्हेकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, पतंजलि योग समितीचे महाराष्ट्र प्रभारी विष्णू भूतडा, जिल्हाध्यक्ष राम घाडगे, आर्षयोग प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष व्यंकटेश हालिंगे, काळे, योग शिबीराच्या संयोजक मिनाताई भोसले, योग प्रशिक्षक कैलास पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# विठुरायाच्या दर्शनासाठी लातूर विभागातून १३५ बसेस धावणार

### कोट्यवधी रुपये उत्पन्नाची अपेक्षा, प्रत्येक आगारातून सोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात लाखोंच्या संख्येने भाविक दाखल होत असतात. यंदा तर मध्य रेल्वेनेही लातूर येथून फेऱ्या वाढविल्या आहेत. दुसरीकडे आता एसटी महामंडळानेही बसेसचे नियोजन केले आहे. यात्रा काळात लातूर विभागातून १३५ बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. २ जुलैपासून प्रत्येक आगारातून बस पंढरपूरकडे धावणार आहे.



दिवाळी, उन्हाळी हंगाम आणि यात्रात्सोव यामधून उत्पन्न वाढविण्यासाठी महामंडळाकडून एक वेगळे नियोजन केले जाते. दरवर्षी लातूर जिल्हा आणि परिसरातून विठुरायाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या काढली जाते. त्यानुसार प्रत्येक आगारातून योग्य असे नियोजन केले जाते. यात्रा काळात या १३५ बसेसचा २ लाख ४३ हजार किमी प्रवास करुन दीड कोटींचे उत्पन्न महामंडळाला मिळेल असा अंदाज बांधण्यात आला आहे. विभागातील लातूर-३४, उदगीर-३०, अहमदपूर-२४, निलंगा-२४, औसा- २३ अशा १३५ बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

२ ते १० जुलै या आठ दिवसाच्या कालावधीत या बसेस पंढरपूरकडे धावणार आहेत. विभागाकडे उपलब्ध असलेल्या बसेसमधूनच हे नियोजन करावे लागत असल्याने इतर शटल फेऱ्यांवर परिणाम हा होतोच.

> दरवर्षीची प्रवाशी संख्या लक्षात घेऊन या बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. ज्या गावातून ४० पेक्षा अधिक भाविक एकाच वेळी पंढरपूरकडे निघणार असतील तर त्यांनाही बस उपलब्ध करुन दिली जाईल.
>
> **- संदीप पडवळ,**
> **विभागीय वाहतूक अधिकारी**

# केंद्रीय राखीव पोलीस दल प्रशिक्षण केंद्रात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
केंद्रीय राखीव पोलीस दल प्रशिक्षण केंद्र (आरटीसी) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ६.३० पासून योग सत्राला सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय राखीव पोलीस दल प्रशिक्षण केंद्राचे पोलीस उपमहानिरीक्षक अमीरुल हसन अन्सारी होते.

कमांडंट श्री. पारसनाथ यांच्यासह अधिकारी, प्रशिक्षणार्थी, जवान, महिला कर्मचारी, कुटुंबीय तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील शिक्षक, विद्यार्थी या योग सत्रात सहभागी झाली होती. योग सत्राचे मार्गदर्शन योगगुरु महर्षी पतंजली योग विद्यालयाचे श्रुतिकांत ठाकूर यांनी केले. त्यांनी विविध योगासने, प्राणायाम, ध्यान आणि मानसिक शांततेच्या पद्धती उपस्थितांना शिकवल्या.

प्रत्येक नागरिकाने दररोज योगाभ्यास आपल्या दिनचर्येचा भाग बनवावा आणि रक्तदानावावत जनजागृती करावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक अमीरुल हसन अन्सारी यांनी केले.

योग सत्रानंतर आयोजित रक्तदान शिबिरामध्ये प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी, जवान आणि प्रशिक्षणार्थींनी सहभागी होत मानवतेप्रती आपली बांधिलकी सिद्ध केली. या शिबिरात १५० हून अधिक युनिट रक्त संकलित करण्यात आले. रक्तदान केवळ जीव वाचविण्याचे कार्य नाही, तर ती एक राष्ट्रसेवा आहे. जेव्हा आपले सुरक्षादलाचे जवान स्वेच्छेने रक्तदान करतात, तेव्हा समाजात एक सशक्त संदेश दिला जातो. जीव वाचविणे ही देखील देशभक्ती आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक अमीरुल हसन अन्सारी यावेळी म्हणाले.

## मंत्री पाटील यांच्या हस्ते उद्या ५० कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून केंद्रीय मार्ग निधी या योजनेअंतर्गत ५० कोटी रुपयांच्या हाळी ते डोंग्रज व घरणी-नळेगाव हुडगेवाडी अशी दोन रस्ता कामे मंजूर करण्यात आली आहेत.

याचा भूमीपूजन सोहळा मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सोमवार, दि. २३ जूनरोजी सकाळी १० वा. शेळगाव फाटा येथे व नळेगाव येथे ग्रामपंचायत सभागृहात सकाळी ११.३० वा. होणार आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून केंद्रीय मार्ग निधी या योजनेअंतर्गत हाळी ते डोंग्रज या दहा किलोमीटरसाठी २५ कोटी रुपये व घरणी-नळेगाव-हुडगेवाडी या दहा किलो मिटर रस्त्यासाठी २५ कोटी रुपये असे ५० कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. याचा भूमीपूजन सोहळा मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सोमवारी सकाळी १० वा. शेळगाव फाटा येथे तर नळेगाव येथे ग्रामपंचायत सभागृहात सकाळी ११.३० वा. संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नळेगावचे सरपंच सूर्यकांत चव्हाण राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून तालुक्यातील विविध मान्यवर उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमासाठी तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे यांनी केले आहे.

# क्रीडा संकुलावर लातूरकरांचा योगाभ्यास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
अकराव्या जागतिक योग दिनानिमित्त लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर शविारी आयोजित कार्यक्रमाला लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे ५ हजार नागरिकांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन योगाभ्यास केला.

यावेळी आमदार विक्रम काळे, प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा प्रशासन, महापालिका, पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, श्रृष्टी जगताप यांच्यासह पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

योग शिक्षक विष्णू भुतडा यांच्या मार्गदर्शनात उपस्थितांनी योगाभ्यास केला. आयुष मंत्रालयाने निश्चित केलेल्या योगासनांची प्रात्यक्षिके यावेळी सादर करण्यात आली.

जगभरात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे.

योग हा आपल्या देशाचा समृध्द सांस्कृतिक ठेवा असून, निरोगी आयुष्यासाठी प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करावा, असे प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी सांगितले. योगाभ्यास केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता, तो दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, असेही त्या म्हणाल्या.

शहरातील विविध शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यास केला. प्रास्ताविक आयुष अधिकारी डॉ. बनशेळकीकर यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुल परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. सूत्रसंचालन उध्दव फड यांनी केले.

# राजमाता जिजामाता संकुलात जागतिक योग दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ जून -**
येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, संगमेश्वर विद्यालय व राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजमध्ये शनिवारी योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संकुलातील विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी योगाभ्यास केला.

यावेळी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, योग या शब्दाचा अर्थ एकमेकांशी जोडले जाणे असा आहे. शरीर व मन जोडले गेल्याने आपल्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक विकास होतो, संतुलन कायम राहते. त्यामुळे व्यक्ती दीर्घकाळ स्वस्थ व निरोगी राहू शकते. सुदृढ व निरोगी आरोग्य ठेवण्यासाठी नियमित योगासन करावे, असे आवाहन त्यांनी केले.



राजमाता जिजामाता हायस्कूलमध्ये ए. बी. मुंडे यांनी, राजमाता जिजामाता प्राथमिक विद्यामंदिरात मीरा चाटे, तुळजाभवानी विद्यालयात अलोक पाचेगावकर, तर संगमेश्वर विद्यालयात जयकुमार कावळे यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, पर्यवेक्षिका सुनीता जवळे, संजय गुरमे, मदन धुमाळ, आर. पी. मुंडे, अविनाश पवार यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ऐसे बेतालांचे बिथरणे...

## रोखठोक

दिनेश गुणे

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे गेल्या २२ एप्रिल रोजी झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर देशात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घडामोडींवरून एक गोष्ट देशातील जनतेच्या निश्चितच ध्यानात आली असेल, ती म्हणजे, संरक्षणविषयक बाबींवरून विरोधकांच्या, विशेषतः काँग्रेसच्या नेत्यांच्या हातात एक पिपाणी आहे आणि त्या पिपाणीतून केवळ एकच, बेताल विरोधाचा सूर काढत काँग्रेसचे नेते जागोजागी जनतेला तो ऐकवत आहेत. यात भर म्हणून, तीच बेसुरी पिपाणी अन्य काही मोजक्या विरोधकांच्या हाती देऊन त्यांनाही तोच सूर काढावयास काँग्रेसने भाग पाडले असून, राहुल गांधी यांच्यापासून ते उद्धव ठाकरे गटाच्या राऊत यांच्यापर्यंत सर्वांनी गेल्या महिनाभरात तीच पिपाणी जीव तोडून फुंकली आहे. त्यातून केवळ मोदीविरोधाचाच सूर निघतो हे माहीत असल्याने तीन दिवसांपूर्वी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनीही भर सभेत ती पिपाणी वाजविण्याचा प्रयत्न केला आणि राहुल गांधींनी काढलेल्या त्याच सुराची री ओढली. कदाचित त्यांच्या या कृतीबद्दल राहुल गांधींनी त्यांचे कौतुक केले असेल. कारण तिकडे राहुल गांधी यांनी मोदीविरोधाचा सूर त्या बेसुऱ्या पिपाणीतून काढल्यावर इकडे संजय राऊत यांनी त्याची री ओढायची एवढेच आतापर्यंत सहसा घडत होते. आता ती पिपाणी तुतारीच्या आवेशात फुंकण्यासाठी ठाकरेदेखील सरसावले, ही बाब राहुल गांधी यांना समाधान देणारी ठरू शकते. दोन दिवसांपूर्वी, १९ जून २०२५ या तारखेस बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेस ५९ वर्षे पूर्ण झालीत. तब्बल साठीच्या उंबरठ्यावर असलेला हा प्रादेशिक पक्ष, महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात रुजला, पण जनतेने या पक्षाच्या हाती एकहाती सत्ता मात्र कधीच बहाल केली नाही, या इतिहासाची सल वाटचालीतील प्रत्येक पावलागणिक शिवसेनेला टोचत होती आणि तीन वर्षांपूर्वी, बाळासाहेबांच्या शिवसेनेत फूट पडल्यानंतर, १० ऑक्टोबर २०२२ रोजी उद्धव ठाकरे यांच्या मशालधारी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतरही ती सल उद्धव ठाकरे यांच्या गटाच्या वाटणीस आली. उद्धव ठाकरे यांच्या जेमतेम तीन वर्षांच्या शिवसेनेने, बाळासाहेबांच्या शिवसेनेचा ५९ वा वर्धापनदिन साजरा केला, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी राहुल गांधी यांना प्रिय असलेल्या मोदीविरोधाच्या पिपाणीचा सूर सभेत उमटविला. पण आता ठाकरे यांच्या मुखातून उमटणाऱ्या अशा विरोधाच्या एकसुरी पिपाणीच्या नादाने महाराष्ट्राची जनता अचंबित होत नाही. ठाकरे यांनी युतीचा कटोरा फेकून महाविकास आघाडीच्या तंबूत पाऊल टाकल्यानंतर त्यांना राहुल गांधींच्या सुराची री ओढणे भागच आहे, हे महाराष्ट्राच्या जनतेला चांगलेच ठावूक आहे. म्हणूनच, आंतरराष्ट्रीय स्तरावर पहलगाम हल्ल्यानंतर घडलेल्या घडामोडी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या त्या वक्तव्यानंतरचे देशातील पडसाद आणि राहुल गांधींपासून राऊत यांच्यामार्फत उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचलेला मोदीविरोधाचा सूर ही एव्हाना केवळ मनोरंजनाची बाब ठरली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त करून भारतातील क्रूर कृतीचा बदला घेण्याच्या उद्देशाने भारतीय लष्कराने पाकिस्तानात सुरू केलेल्या धाडसी कारवाईचे जगभरातून कौतुक होत असताना आणि त्या निमित्ताने देशाच्या लष्करी शक्तीची जाणीव उभ्या जगाला होत असताना, कारवाई यशस्वी करून लष्कराने पाकिस्तानातील संघर्षास विराम दिला ही बाब जनतेने जाणली. पाकसोबतच्या या कारवाईस विराम देण्याच्या लष्कराच्या निर्णयानंतर जनतेच्या मनात काही शंका निर्माण होणे साहजिकच होते. लष्कराने आपली सारी ताकद, युद्धनीती, तंत्रज्ञान पणाला लावून थेट पाकिस्तानात घुसून सुरू केलेली कारवाई अंतिम विजयाच्या टप्प्यावर असताना अचानक कारवाई स्थगित केल्याने पाकविरोधाच्या आणि बदला घेण्याच्या भावनेने उत्तेजित झालेल्या समाजमनात अशी नाराजी उमटणे साहजिकही होते. भारतीय लष्कराने पाकिस्तानचे नामोनिशाण मिटविण्याची संधी सोडायला नको होती, अशा भावनाही उमटू लागल्या होत्या. पण कालांतराने, या संघर्षाचे संभाव्य बरे-वाईट परिणाम स्पष्ट होऊ लागल्यानंतर समंजस जनतेने त्या भावनेस आवर घातला, पण नेमके त्याच काळात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका वक्तव्याने पुन्हा एकदा उलटसुलट चर्चा सुरू झाली. भारत आणि पाकिस्तानवर व्यापारी बंधने घालण्याचा इशारा देऊन दबाव टाकल्यामुळेच भारताने संघर्षाला स्थगिती दिली असा सूर लावत ट्रम्प यांनी तिकडे संघर्षविरामाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न सुरू करताच राहुल गांधी यांच्या पिपाणीला सूर सापडला आणि सुमारे पाच वर्षांपूर्वी काढलेला सूर पुन्हा एकदा पिपाणीतून वाजविण्यासाठी राहुल गांधी यांनी तुतारीच्या आवेशात पिपाणी फुंकली. भारत आणि चीनच्या सीमेवरील काही घडामोडींच्या संदर्भात ट्विटरवर टिप्पणी करताना, बरोबर पाच वर्षांपूर्वी याच तारखेस, म्हणजे २१ जून २०२० रोजी राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी हे प्रत्यक्षात सरेंडर मोदी आहेत, अशी नोंद केली होती. त्यांच्या या वक्तव्याचा योग्य समाचार तेव्हाच घेतला गेला आणि राहुल गांधींचा मुखभंग झाल्याच्या अप्रिय अनुभवाने काँग्रेस केविलवाणी झाली होती. त्याच वक्तव्याचा पुनरुच्चार करून ट्रम्प यांच्या वक्तव्याचा आधार घेत राहुल गांधी यांनी सरेंडर मोदी हा फसलेला शब्दप्रयोग पुन्हा एकदा विमर्शाच्या रूपाने राजकारणात पेरण्याचा प्रयत्न केला आणि पहिल्यांदाच असे यमक जुळल्याच्या आनंदात राऊत यांनी त्या सुराची री ओढली. ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे हे टोमणेवीर असल्याचे महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांच्या भाषणात टोमण्यांची पखरण असते आणि त्यासाठी ते वेगवेगळी यमके जुळवितात हेही आता जनतेस माहीत आहे. त्यामुळे, राहुल गांधींसारख्या



नेत्याच्या पिपाणीतन उतरलेले हे नरेंदर-सरेंडर यमक वापरून लोकांची करमणूक करण्याची चालून आलेली नामी संधी त्यांनी साधली नसती, तर कदाचित लोकांच्या भुवया उंचावल्या असत्या. पण ठाकरे यांनी तसे होऊ दिले नाही. तिकडे ट्रम्प यांनी आपल्या उतावळ्या वक्तव्याचा सूर मवाळ करून श्रेयाच्या प्रयत्नांपासून माघार घेतली, तरी इकडे यांच्या पिपाणीतील सरेंडरचा सूर वाजतच होता.

जेव्हा आपली क्षमता सिद्ध करता येत नाही, तेव्हा क्षमता असलेल्या प्रतिस्पर्ध्याच्या कर्तबगारीची रेषा पुसण्याचा प्रयत्न केला जातो. खरे म्हणजे, कर्तबगार प्रतिस्पर्ध्याच्या क्षमतेच्या रेषेहून अधिक लांबीची रेषा उमटवून आपली क्षमता सिद्ध करायची असते, पण राजकारणात सहसा तसे घडत नाही. मोदी यांच्याशी स्पर्धा करावयास निघालेल्या काही नेत्यांनीही तेच केलेले दिसते. नरेंदर नव्हे, सरेंडर हा विमर्श प्रस्थापित करण्याचा प्रकारदेखील याच नीतीचा भाग असावा. अन्यथा, आपले उद्दिष्ट यशस्वीपणे साध्य करून व पाकिस्तानसह संपूर्ण जगाला आपल्या क्षमतांची जाणीव करून देऊन लष्करी कारवाई स्थगित करण्याच्या निर्णयावर ट्रम्प यांच्यासारख्या उतावळ्या नेतृत्वाच्या तात्पुरत्या वक्तव्याचा आधार घेऊन घाईघाईने टिप्पणी करण्याचा उतावीळपणा देशातील विरोधकांनी केला नसता. पाकिस्तानी दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करण्याच्या भारताच्या मर्यादित कारवाईचे महत्त्व जगाला पटवून देण्यासाठी विदेशांत सर्वपक्षीय शिष्टमंडळे एकमुखाने या कारवाईचे आणि भारताच्या भारत सर्वश्रेष्ठ युद्धनीतीबरोबरच राजनीतीचे समर्थन करत असताना, इकडे भारतातील विरोधी पक्षांचे काही नेते मात्र एकमुखाने मोदी यांच्या नेतृत्वास दूषणे देत मोदीविरोधी विमर्श प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत होते, हे चित्र देशाने पाहिले. आता ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या वक्तव्यातील श्रेयाचा प्रयत्न पुसून टाकला आहे. पंतप्रधान मोदी यांनी ट्रम्प यांचे ते श्रेयवादी विधान साफ शब्दांत आणि कृतीतूनही धुडकावून लावले आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यानच्या संघर्षविरामासाठी कोणाचीही मध्यस्थी नव्हती, पाकिस्तानच्या विनंतीवरून भारताने हा निर्णय घेतला आणि कोणत्याही दबावास भारत बळी पडलेला नाही, हे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट शब्दांत सिद्ध केले. सरेंडर मोदी नावाचा विमर्श प्रस्थापित करू पाहणाऱ्या पिपाण्यांची तोंडे त्यानंतर बंद होणे अपेक्षित होते, पण तसे झालेच नाही. मोदी यांच्या ज्या स्पष्टीकरणाने व कणखर भूमिकेने ट्रम्प यांनाही त्यांच्या वक्तव्यातील दर्प पुसावा लागला, त्या स्पष्टीकरणानंतरही इकडे या पिपाण्या मात्र, तोच सूर फुंकण्यासाठी प्राण पणाला लावतो, हे चित्र फारसे चांगले नाही.

दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका जगासमोर मांडून त्यास जागतिक समर्थन मिळविण्याकरिता सर्वपक्षीय शिष्टमंडळे राजकीय मतैक्याचे दर्शन घडवतात हे चित्र जगाच्या पटलावर उमटत असताना, इकडे देशात मात्र विरोधकांनी आपला सूर वेगळाच असल्याचे दाखवून देण्याचा अट्टहास करावा, हे काहीसे अनाकलनीय आहे. कारण, पाकिस्तानातून माजविला जाणारा दहशतवाद हा देशाच्या दृष्टीने संवेदनशील आणि भारतीय जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असून मोदी यांनी सातत्याने त्याविरुद्ध जागतिक मतैक्य घडविण्याकरिता प्रयत्न जारी ठेवले आहेत. कोणत्याही वैश्विक मंचावर हा मुद्दा मांडून दहशतवादाच्या विरोधात जगाला संघटित करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू असताना, आपल्या देशाचा सर्वोच्च नेता हा पराभूत मनोवृत्तीचा आहे, हा विमर्श प्रस्थापित करण्याच्या राजकारणाचे पितळ आता उघडे पडत चालले आहे. भारत-पाकिस्तानदरम्यानच्या संघर्षात आपण मध्यस्थी केली आणि दबाव आणल्यामुळेच संघर्षविराम झाला असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष वारंवार करत होते, तेव्हा उतावळ्या विरोधकांनी त्यांच्या विधानाची तळी उचलत मोदी यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्नसुरू केला, तेव्हा मोदी स्वतः मात्र स्थिर दिसत होते. कोणत्याही कृतीसाठी ते योग्य संधीची आणि योग्य वेळेची वाट पाहतात, तेवढा संयम दाखवितात, असे मोदी यांच्याविषयी सांगितले जाते. याआधी अनेकदा तसे दिसूनही आले आहे. राहुल गांधी किंवा संजय राऊत, उद्धव ठाकरे यांनी ट्रम्प यांच्या विधानाच्या पालख्या वाहण्याची जबाबदारी घेतल्यानंतर जी-७ परिषदेच्या निमित्ताने जागतिक मंचावर याबाबतचा जाहीर खुलासा करण्याच्या संधीची मोदी यांनी प्रतीक्षा केली. या परिषदेच्या निमित्ताने ट्रम्प आणि मोदी यांच्यात भेटीदरम्यान या मुद्द्यावर चर्चा होणे अपेक्षितच होते. पण ट्रम्प यांना माघारी परतावे लागल्याने, त्यांची थेट समोरासमोर चर्चा झाली नाही आणि ट्रम्प यांनी दूरध्वनीवरून अर्ध्या तासाहून अधिक वेळ मोदी यांच्याशी चर्चा केली. या चर्चेतच मोदी यांनी ट्रम्प यांच्या वक्तव्यातून माजलेल्या वादळास विराम दिला आणि भारत-पाकिस्तान संघर्षात कोणाचीही मध्यस्थी भारताने मान्य केलेली नाही, हेही स्पष्ट संकेत दिले.

ऑपरेशन सिंदूर या कारवाईनंतर ट्रम्प आणि मोदी यांच्यात प्रथमच झालेल्या या संभाषणादरम्यान ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांना दिलेले अमेरिका भेटीचे निमंत्रणही मोदी यांनी नाकारले, तेव्हा राहुल गांधींच्या पिपाणीतून उमटणारा सूर बेताल असल्याचे स्पष्ट झाले होते. जी-७ परिषदेचे आणखी एक सकारात्मक फलित मोदी यांच्या उपस्थितीमुळे पाहावयास मिळते. गेल्या काही वर्षभरात, दहशतवादाच्या मुद्यावरूनच कॅनडा आणि भारताचे मतभेद उघड झाले होते. भारताविरोधातील दहशतवादी कारवायांना कोणत्याही देशाच्या भूमीवर प्रोत्साहन मिळू नये ही भारताची भूमिका त्या वेळीही स्पष्टपणे मांडण्यात आली होती. या परिषदेच्या निमित्ताने मोदी यांच्या कॅनडा भेटीत या भूमिकेस कॅनडाचे पाठबळ मिळण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाल्याचे चित्र आहे.

मोदी आणि ट्रम्प यांच्यात दूरध्वनीवरून झालेल्या चर्चेसाठीदेखील ट्रम्प यांनीच पुढाकार घेतला होता, असेही आता स्पष्ट झाले आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी याबाबतचा आवश्यक तो तपशील एका निवदनाद्वारे देशासमोर स्पष्ट केला आहे. ट्रम्प आणि मोदी यांच्या दरम्यान कॅनडामध्येच चर्चा होणे अपेक्षित होते, पण ट्रम्प यांना लवकर अमेरिकेस परतावे लागल्याने ती थेट चर्चा होऊ शकली नाही. त्यानंतर ट्रम्प यांच्या आग्रहावरून या दोन्ही नेत्यांमध्ये ऑपरेशन सिंदूर कारवाईबाबत सुमारे ३५ मिनिटे दूरध्वनीवर चर्चा झाली. या कारवाईदरम्यान, दहशतवादविरोधातील भारताची भूमिका जगासमोर मांडण्यात आली होती. ७ आणि ८ मे च्या रात्री भारताने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्याचे लक्ष्य निश्चित केले होते आणि ही कारवाई केवळ दहशतवादी अड्ड्यांपुरती मर्यादित होती, असेही भारताने वारंवार स्पष्ट केले होते. त्यानंतर पाकिस्तानच्या विनंतीवरून उभय देशांच्या लष्कराने संघर्षविरामाचा निर्णय घेतला व त्या वेळी चर्चेच्या कोणत्याही टप्प्यात भारत पाकिस्तान दरम्यानच्या संघर्षविरामाकरिता अमेरिकेच्या मध्यस्थीचा किंवा व्यापार करारासंदर्भातील कोणताही मुद्दा समोर आला नव्हता, असे स्पष्टीकरण मोदी यांच्याकडून दिले गेल्याने, ट्रम्प यांचा दबावाचा दावा आता दुबळा ठरला आहे. स्वतः ट्रम्प यांनीही ताज्या वक्तव्यात सारवासारव करण्याचा प्रयत्न केलेला असताना, मोदी यांच्या प्रतिमाहननाच्या प्रयत्नात देशाच्या सामर्थ्यावर प्रश्नचिन्हे उमटविणारे विमर्श पसरविण्याचे डाव थांबवावयास हवेत. राहुल गांधी तेवढा संयम दाखवितील किंवा नाही हे खुद्द काँग्रेसजनांसही सांगता येणार नाही. पण त्यांच्या सुरात सूर मिसळून तोंडघशी पडण्याची वेळ आपल्यावर येणार नाही याची काळजी घेण्याचा शहाणपणा इतरांनी दाखवायला हवा. केवळ यमक जुळविणारा टोमणा एवढ्यापुरती ही टीका विनोदी होऊ नये.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### प्रतिक्रिया देताना विवेक बाळगा

नाशिक येथील उबाठा गटाचे नेते सुधाकर बडगुजर यांच्या भाजप प्रवेशानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना, राजकारणातले जे आम्हाला कळते तेवढेही कळत नाही ही सांगण्याची जणू स्पर्धा लागल्याचे दिसत आहे. यातील खरी गोम समजून न घेता केवळ भावनात्मक विचार करून व्यथित होऊन देवेंद्र फडणवीस यांना जबाबदार धरणे तितकेसे योग्य नाही असेच म्हणावे लागेल. मुळात नाशिक लोकसभा निवडणुकीत महायुतीचा उमेदवार पराभूत झाला. नाशिक हे एकेकाळी मनसेचा व नंतरच्या काळात शिवसेनेचा गड राहिला आहे. आता तिथे कुंभमेळा पार पडणार आहे. अशा वेळी स्थानिक प्रशासनाचे अनन्यसाधारण महत्त्व असते. महानगर पालिका हातात येण्यासाठी व भाजपाला मजबूत करण्यासाठी काही प्रयोग करणे आवश्यक आहे. उद्या कुंभमेळा अयशस्वी झाला तर योगी आदित्यनाथ यांच्याशी तुलना करून त्याचेही खापर फडणवीसांवर फोडायला आपणच पुढे असू. कारण आपण फार भावनिक असतो. ५० आमदारांची संख्या असतानाही मुख्यमंत्रिपद दिल्यावरही समाधान होत नाही. आतून देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो. काही आंदोलने करणाऱ्यांना रसद पूरवून त्यांच्या जातीचा व पक्षाचा उद्धार केला जातो. बरं हे बाहेर बोलताही येत नाही. कारण युती आहे. अगदी कालचेच उदाहरण पाहता येईल. नुकतेच एक शेतकऱ्यांसाठीचे आंदोलन झाले. स्वत: महसूल मंत्री दोनदा ते आंदोलन सोडवण्यासाठी गेले. पण ते सुटले नाही. पण सहकारी पक्षाचा एक मंत्री ते आंदोलन सोडवायला गेला आणि ते आंदोलन लगेच सुटले. याचा काही अर्थबोध आपल्या कार्यकर्त्यांना होणार आहे की नाही? आपल्या नेत्यांवर थोडा विश्वास ठेवा. ते आपल्या विचारांशी प्रतारणा करणार नाहीत याची खात्री बाळगा. या पक्षात कोणी एकटा नेता निर्णय घेत नाही हेही लक्षात घ्यायला हवे. राजकारण हे अनेक पदरी असते. त्यातील काहीच पदर आपल्याला दिसतात, बहुतेक पदर बाह्य स्वरूपात दिसत नाहीत किंवा उलगडत नाहीत. त्यामुळे एकदम भावनिक होऊन, व्यथित होऊन व्यक्त होणे चांगले नाही. त्याचा फायदा जे उघड शत्रू (विरोधक )आहेत त्यांना तर होतोच पण छुप्या शत्रूंना तो जास्तच होतो याचेही भान ठेवावेच लागते.

देवेंद्र फडणवीस यांनी २०१४, २०१९, २०२४ अशा तीन विधानसभा निवडणुकीत भाजपाचे १००च्या वर आमदार निवडून आणले जे कधी (अ)जाणत्या राजालाही जमले नाही. या पक्षासाठी खस्ता खाणाऱ्या हयात असलेल्या व नसलेल्या नेते, कार्यकर्त्यांना याचा अभिमानच वाटेल. महाराष्ट्रात भाजपाने आपले राजकारण दीर्घ काळासाठी स्थिर व यशस्वी करण्यासाठी बुद्धिबळाचा एक पट मांडला आहे. त्यातील काही चालीवरून पूर्ण डावाचा अंदाज बांधू नये. त्यासाठी संयम ठेवावा लागेल. अंतिम चालीपर्यंत वाट पाहावी लागेल. निकाल आपल्याच बाजूने लागेल यावरही विश्वास ठेवावा लागेल. विरोधकांना बळ मिळेल व आपले कार्यकर्ते व हितचिंतकांमध्ये भ्रम पसरेल अशा प्रतिक्रिया टाळणे सर्वांच्याच हिताचे आहे.

**प्रा. श्रीकांत पांडे**/नागपूर

### दुर्दैव की जीवन-मृत्यूतील काळाचा अंतरपाट

अहमदाबाद विमान अपघातानं देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या अपघातात आप्तेष्ट गमावलेल्या नातेवाईकांचा आक्रोश पाहून 'देवा! अशी वेळ कुणावरही येऊ देऊ नको रे बाबा...' अशी आर्त हाक अनेकांच्या हृदयातून येत आहे. या घटनेत अपघातग्रस्त विमानातील एक प्रवासी नशीब बलवत्तर म्हणून बचावला. विमानातील तब्बल २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याने देश शोकसागरात बुडाला आहे. अपघातामागील कारणांचा मागोवा घेतला जात आहेच. यातील एक प्रवासी प्रतीक जोशी गेल्या सहा वर्षांपासून लंडनमध्ये राहत होते. त्यांनी आपली पत्नी आणि भारतात राहणाऱ्या त्यांच्या तीन लहान मुलांसाठी परदेशात उज्ज्वल भविष्य घडवण्याचे स्वप्न पाहिले होते. वर्षानुवर्षे नियोजन, कागदपत्रे आणि संयमाने ते स्वप्न अखेरीस साकार होत होते. फक्त दोन दिवसांपूर्वी त्यांची पत्नी डॉ. कोमी व्यास यांनी भारतातील नोकरीचा राजीनामा दिला. बॅग भरल्या गेल्या, निरोप घेतले गेले... सकाळी सर्व पाच जण आशा, उत्साह आणि योजनांनी भरलेले लंडनला जाण्यासाठी एअर इंडिया फ्लाईट १७१ मध्ये चढले. सेल्फी काढला नि नातेवाईकांना पाठवला. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी एकतर्फी प्रवास; पण ते स्वप्नांच्या नगरीत पोहोचलेच नाहीत. विमान कोसळले आणि कुणीही वाचले नाही. काही क्षणात आयुष्यभराची स्वप्ने धुळीला मिळाली. आई, वडील आणि त्यांच्या तीन मुलांची विमानात बसल्याच्या आनंदाच्या भरात घेतलेली शेवटची सेल्फी... हा आनंद त्यांच्या पाच जणांच्या सुखी परिवारावर कधी दुःखाचा डोंगर घेऊन आला त्यांनाही समजले नाही. विमान धावपट्टीवर सरकत होतं, खिडकीबाहेरचं शहर हळूहळू लहान होत चाललं होतं आणि आत बसलेले कुणी पहिल्यांदाच विमान प्रवास करत होतं, कुणी रोजचं; पण प्रत्येकाच्या मनात एक समान भावना होती- 'पोहोचल्यावर फोन करतो.' कुणी आईला टेक्स्ट केला, कुणी पत्नीला फोटो पाठवला, कुणी ऑफिसच्या ग्रुपवर 'टेक ऑफ' असा मॅसेज टाकला आणि कुणीतरी मनातल्या मनात प्रार्थना केली, 'सगळं नीट होऊ दे रे देवा!' त्याच क्षणात काळाने आपली योजना आखली होती. एक मोठा आवाज, आगीचे



ज्वाळा आणि क्षणात सगळं संपलं. पिशव्या, पासपोर्ट, मोबाईल, घड्याळ असं सारं काही जागेवर होतं. फक्त माणसं नव्हती. उरला फक्त धूर, राख आणि त्यांच्या मागे पडलेली माणसांची वाट पाहणारी नजर; फोनवरचे शेवटचे मॅसेज अजूनही वाचले गेले नाहीत. 'कॉल मी व्हेन यु लॅण्ड...', 'मिस यु...' आणि 'टेक केअर...' यातच कुठे रडणारी आई होती, कुठे गोंधळलेली मुलं तर कुठे फोन कट झाल्यावर अजूनही 'हॅलो...हॅलो?' म्हणणारं कुणीतरी. कुणीच ठरवत नाही की शेवटचा टेक्स्ट कोणता असेल, शेवटची मिठी कोणती असेल आणि शेवटचा शब्द कोणता असेल. आज जे गेले, त्यांच्या हसण्याचा प्रतिध्वनी अजूनही कुणाच्या आठवणीत जिवंत आहे. त्यांनी मागे ठेवलेली स्वप्नं, आवाज, माणुसकी हे सगळं आपल्याला एकच गोष्ट सांगते, 'आयुष्य क्षणभंगुर आहे. त्यामुळे प्रत्येक क्षण प्रेमाने जगा आणि अगदी मनापासून माफ करा.' मृत्यू अटळ आहे, पण तो येईपर्यंत 'मृत्यूशिवाय' जगणं, हेच खरं आयुष्य आहे.

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

### देव तारी त्याला कोण मारी?

आज सकाळी अमृता नेहमीप्रमाणे फिरायला गेली, पण का कुणास ठावूक प्रसन्न वाटत नव्हतं. काहीतरी अघटित घडेल, असं काहीसं वाटत होतं. खरं म्हणजे आज अमृताने व तिच्या मैत्रिणीने बाहेर शॉपिंगला जाण्याचा प्लॅन केला होता. बरेच दिवसांनी भेटलेली तिची मैत्रीण भूमी चव्हाण आज लंडनला जाणार होती. त्यामुळे तिला करमत नव्हतं अन् त्याचवेळी टीव्हीवर तिने ऐकलं; १२ जून २०२५ रोजी अहमदाबादवरून लंडनला जाण्यासाठी झेपावलेले विमान कोसळले. बातमी ऐकून अमृताच्या हृदयाचा ठोका चुकला. कारण तिची मैत्रीण भूमी याच विमानाने जाणार होती... अमृता रडूच कोसळले. हुंदके देतच तिने तिची मैत्रीण सायलीला ही बातमी सांगितली. सायली तातडीने तिच्या घरी आली. दोघीही शोकसागरात बुडाल्या. थोड्याच वेळाने दरवाजाची बेल वाजली. दरवाजा उघडला तर समोर प्रत्यक्ष तिची मैत्रीण भूमी चव्हाण सामानासह उभी होती. तिने अत्यानंदाने तिला मिठी मारली व म्हणाली, ''अय्या, तू या विमानाने गेली नाही?'' भूमी म्हणाली, ''नाही गं, मला देवानेच वाचवलं. मी १० मिनिटे उशिरा पोहोचले म्हणून मला एअर इंडियाच्या लोकांनी आत जाऊ दिले नाही. मी त्यांना खूप विनवण्या केल्या. ट्रॅफिक जाममुळे मला लवकर येता आले नाही. विमानही अजून सुटलेलं नाही. तरी मला त्यांनी मला आत जाऊ दिले नाही. खरं तर तेव्हा मला त्यांचा खूप राग आला होता. त्या लोकांना बोल लावतच मी घरी येण्यासाठी निघाले. पण टॅक्सीत बसल्यावर मोबाईलवरून, जेव्हा कळाले की, मी ज्या विमानाने जाणार होते ते विमान कोसळले. त्यावेळेस मी देवाचे आणि मला आत न जाऊ देणाऱ्यांचे आभार मानले.'' 'देव तारी त्याला कोण मारी' याचा प्रत्यक्ष प्रत्यय आमच्या समोर होता. इतकंच काय, ब्रिटिश प्रवासी रमेश विश्वासकुमार या विमान अपघातातून आश्चर्यकारकरीत्या बचावला. या भीषण अपघातात सर्व प्रवासी सामानासकट सर्व जळून खाक झाले, पण मैथिली पाटील यांची श्रीमद्भगवद्गीता व लड्डू गोपालकृष्णाची हसरी मूर्ती मात्र सुरक्षित राहिली. हाही एक दैवी चमत्कारच म्हणावा लागेल.

**शालिनी कुकडे**/९८५०९९०३३४

### माझे जीवन गाणे

प्राचीन काळी रोम व ग्रीक काळात लहान मुलांना फक्त तीन विषय प्रथम शिकविले जात असत. कवायत, तर्कशास्त्र आणि संगीत. कवायत ही निरोगीपणासाठी, तर्कशास्त्र हे योग्य दिशेने बुद्धीचा विकास होण्यासाठी आणि संगीत हे विविध भावभावना, संवेनशीलता व सर्जनशील वृत्तीची निर्मिती होण्यासाठी. संगीताचे महत्त्व ज्या देशांनी जाणले, आज तेच देश महासत्ता बनून प्रगतिपथावर आहेत. आज आपल्या देशातील महत्त्वपूर्ण अशा दोन गोष्टींसमोर संपूर्ण जग झुकते. ते म्हणजे आपले अध्यात्म आणि अभिजात भारतीय शास्त्रीय संगीत. या अभिजात शास्त्रीय वारसा असलेल्या आपल्या भारत देशात भावी पिढी घडवण्याच्या दृष्टीने विचार करता बालवयातील अस्थिर व चंचल अवस्थेतील मुलांना या वातावरणात आणून संगीत शिक्षण दिले असता एक सर्जनशील आणि संवेदनशील अशी पिढी तयार होईल.

संगीत म्हणजे गायन, वादन आणि नर्तन. तसेच ते कर्णमधुर आणि जनरांजन करणारे असते. गाण्याचा विचार केला असता जर ते नीट ऐकलं तर ते मेंदूपर्यंत पोहोचतं. म्हणूनच तो एक उपचाराचा भाग आहे हे सिद्ध झालेले आहे. मानवी जीवनात त्याचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. संगीतात एक नाद आहे आणि त्यात स्वरमाधुर्य आहे. कुठलंही दडपण, रोग बरं करण्याची ताकद त्यात आहे. गाण्यातून मनाला शांत वाटतं. तुम्ही शांत असाल, जागाही शांत असेल आणि कुठलाही विचार त्यावेळी मनात नसेल तर अशावेळी ऐकलेल्या चांगल्या गाण्यांचा शरीरावर नक्की योग्य परिणाम होतो. रक्ताभिसरण चांगले होते. शास्त्रीय संगीत गाण्याऱ्याचा श्वास खूप वर्ष टिकतो असे म्हणतात. सध्या कोरोना काळात याचा कितीतरी फायदा होतो आहे. कारण संगीत हा आपला सोबती आहे, आधार आहे.

चांगले, कर्णमधुर संगीत ऐकल्याने, गायल्याने मनात सकारात्मक लहरी उत्पन्न होतात, मनात घोळत असतात, मनाच्या तळाशी जाऊन बसतात आणि निर्गुण सुखाचा आनंद मिळतो आणि अंतरात्म्याशी संवाद साधला जातो. सततच्या रियाजाने स्मरणशक्ती वाढते. तसेच ताणतणावातून मुक्तता मिळते. संगीताचा प्रत्यक्ष संबंध मेंदूशी जोडला जातो आणि परमानंदाची अनुभूती येते. आध्यात्मिक बैठकीसाठी संगीत एक अनमोल साधन आहे म्हणूनच प्राचीन काळापासून संतांनी, महापुरुषांनी संगीताच्या आधारे आध्यात्मिक उन्नती केली आहे. आजकाल कॉर्पोरेट कार्यालयात सुद्धा संगीताची धून वाजविली जाते कारण त्याने कार्यक्षमता वाढते. आपला नेहमी चांगले गाण्यावर आणि ऐकण्यावर कटाक्ष असावा. त्याने सकारात्मक ऊर्जा आपल्याला मिळते. असे अक्षय आणि अविनाशी संगीत आहे... पण एक गोष्ट खरी.... गाना आये या ना आये, गाना चाहिए....

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### समाजाची हरवत चाललेली संवेदना

नुकताच एका साहित्य संमेलनाला निमंत्रित गझलकार म्हणून गेलो होतो. रात्री उशिरा नागपूरला परतलो. गावाला जायला तेव्हा बस उपलब्ध नसल्यामुळे नातेवाईककडे थांबलो. दुसऱ्या दिवशी टेकाडीला जाण्यासाठी नागपूरच्या गणेशपेठ येथील मुख्य बसस्थानकावर आलो. वेळ होती सकाळी पावणे सातची. रामटेकला जाणारी एक बस होती पण तिला निघण्यास उशीर होता म्हणून तिथेचं फिरत होतो.

तेवढ्यात एक आजी दृष्टीस पडली. ती कुणाला तरी शोधत होती. मी विचारल्यावर म्हणाली! काय सांगू पोरा गेले एखाद तासापासून मी माझ्या गावची बस शोधते आहे. पण कुणीच नीट सांगत नाही की बस कुठे लागते. नुसती इकडून तिकडे फिरत आहे. विचारून विचारून थकून गेले.

एव्हाना तिचा चेहरा रडकुंडीला आला होता हे माझ्या लक्षात आले. मी म्हटलं, कुठे जायचे आहे, तर म्हणाली, कोंढाळीला. मी फलाटावर कोंढाळीची बस कुठे लागते ते शोधू लागलो. पण काही कळलं नाही. तेवढ्यात एका वाहकाला विचारले. ते म्हणाले, मागे ११नंबरला लागते म्हणून आजीला तिकडे घेऊन गेलो. तर म्हणाले, इथे नाही लागत. बाहेर गेटवर जा आणि अमरावतीला जाणाऱ्या कुठल्याही बसमध्ये बसा.

आता माझ्यासारख्याची बस शोधायला इतकी फजिती होत असेल तर या म्हाताऱ्या आजीला किती त्रास झाला असेल कल्पनाच करवत नाही. मग मी त्या आजीचा हात धरून गेटकडे जाऊ लागलो. फिरून फिरून बिचारी दमून गेली होती.

तेवढ्यात नागपूर व्हाया अमरावती, अकोला, बुलढाणा ही बस नजरेस पडली. चालकाला विचारले तर म्हणाला, ही नाही जात. मग त्या आजीला घेऊन मी पुन्हा फलाटाकडे जाऊ लागलो. समोरून एक वाहक आले. त्यांना विचारलं, दादा या आजीला कोंढाळीला जायचं आहे. कृपया यांना कोंढाळीच्या बसमध्ये बसवून द्या. तर म्हणाले, बसा इथेच. हीच बस थांबते कोंढाळीला. अहो, मी तर आताच या बसच्या चालकाला विचारलं तर म्हणाले, ही नाही थांबत कोंढाळीला. तुम्ही दुसरी बस शोधा येईल मागून. मग त्या आजीला त्याच बसमध्ये बसवून, चरणस्पर्श करून मी रामटेकच्या फलाटावर आलो.

मला कळत नाही की कुणी असं कस वागू शकतो. हल्ली सेवाभावाला तर काही मोलच उरलेलं नाही. आता त्या आजीला मी भेटलो नसतो तर ती कोंढाळीला जाऊ शकली असती का? की दिवसभर या फलाटाहून त्या फलाटवर नुसती भटकत राहिली असती? यासाठी उपाय म्हणजे परिवहन महामंडळाने काही खाकी वेषातले सेवक नेमून अशा हालचाल मंदावलेल्या वयोवृद्ध प्रवाशांना हेरून त्यांची योग्य ती विचारपूस करून त्यांना संबंधित गावाच्या बसमध्ये बसवून देण्याची व्यवस्था करून द्यावी, सीसीटीव्ही कॅमेऱ्याने निगराणी ठेवून अशा प्रवाशांची काळजी घ्यावी.

**विजय राधामाणिक वासाडे**/८२०८५८३३०९

### तरुणांनी चौकट मोडून विचार करण्याची गरज

आजचा तरुण देशाचे भविष्य आहे. या तरुणांच्या जोरावरच आपण आपल्या देशाला तरुण भारत म्हणून संबोधतो. त्यामुळे आज तरुणांनी स्वतःला सिद्ध करण्याची गरज निर्माण झाली आहे. आजच्या गतिमान युगात यशस्वी होण्यासाठी तरुणांनी पारंपरिक चौकटीत राहून विचार करणे पुरेसे ठरत नाही. प्रत्येक क्षेत्रात झपाट्याने बदल होत असताना, तरुणांनी ''थिंक आऊट साईड द बॉक्स'' म्हणजेच पारंपरिक चौकट मोडून सर्जनशील आणि वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. पारंपरिक साच्यापलीकडे जाऊन नव्या दृष्टिकोनातून समस्यांचा विचार करणे, नवीन कल्पना, नवीन प्रयोग आणि सर्जनशीलतेच्या आधारे मार्ग शोधणे म्हणजेच चौकटी बाहेरचा विचार. आजच्या तरुणांनी खरोखरच पारंपरिक चौकटीबाहेर जाऊन विचार करण्याची कला आत्मसात केली पाहिजे. कारण आजचे युग हे प्रचंड स्पर्धात्मक आहे. आजची स्पर्धा ही खऱ्या अर्थाने कल्पनाशक्तीची आहे. कोणतीही नोकरी, व्यवसाय किंवा कला हे क्षेत्र पारंपरिक मार्गाने चालत नाहीत. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास, आज स्टार्टअप संस्कृतीचा मोठ्या प्रमाणात उदय झाला आहे. एमबीए, फार्मसी, इंजिनीअरिंगसारखे उच्चशिक्षण घेतलेले अनेक उद्यमी तरुण नोकरीचा अवलंब न करता काहीतरी नवीन कल्पना वापरून आपले स्टार्टअप सुरू करत आहेत व त्यांना चांगली प्रतिष्ठा व प्रसिद्धी मिळत आहे. तसेच आज समाज, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात जी आव्हाने आहेत, ती पारंपरिक उपायांनी सुटत नाहीत. म्हणूनच आज जगाला नव्या कल्पनांची गरज आहे व या कल्पना निर्माण करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात तरुणांमध्येच असते.

चौकटीबाहेर विचार करण्याची क्षमता व कौशल्य तुम्हाला आत्मसात करावे लागते. ही क्षमता व कौशल्य आत्मसात करण्यासाठी तुम्ही नियमित वर्तमानपत्र वाचा, आत्मचरित्रे वाचा, प्रवासवर्णने वाचा, इतर माहितीपूर्ण पुस्तके वाचा, विविध क्षेत्रांतील यशस्वी लोकांना भेटा व त्यांच्याशी चर्चा करा, शक्य तेवढा प्रवास करा. यामुळे तुम्हाला नवनवीन गोष्टी पाहायला, अनुभवायला व शिकायला मिळतात. ज्यामुळे तुमचा दृष्टिकोन बदलतो व तुमच्या विचारशक्तीला चालना मिळते. यातून तुमची सर्जनशीलता चांगल्या प्रकारे विकसित होते. त्यानंतर स्वतःला एक सवय लावून घ्या, ती म्हणजे प्रश्न विचारण्याची सवय. 'हे असंच का आहे?' असा प्रश्न नेहमी विचारत राहा. उत्तर शोधण्याच्या प्रवासात नवीन कल्पना मिळतील ज्या नंतर तुम्ही प्रत्यक्षात आणू शकता. 'थिंक आऊट साईड द बॉक्स' या संकल्पनेचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे नेहमी प्लॅन बी तयार ठेवा. यामुळे तुमच्या वेळेची, पैशाची व शक्तीची बचत होते. या प्रक्रिये दरम्यान सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अपयशाला घाबरू नका. कारण वेगळा विचार यशस्वी होतोच असे नाही. अपयशातूनच पुढची संधी तयार होत असते.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

### दानशूर सराफाचे अभिनंदन

समाज माध्यमावरील एखाद्या पोस्टचा समाजावर प्रभावी परिणाम होत असेल आणि ती पोस्ट व्हायरल व्हायला हवी, कारण त्यातून आजच्या पिढीला एका नवा संदेश मिळतो आणि आपण सुद्धा या समाजाकरिता काहीतरी भरीव असं करावं अशी भावना त्याच्या मनात निर्माण होऊ शकते.



आपल्या समाजात रोज काहीतरी नवीन घडत असतं. नुकतीच अशी एक पोस्ट खूप व्हायरल झाली. त्यात तब्बल एक ९३ वर्षांचा वृद्ध आपल्या पत्नीला एक दागिना तरी घेऊन द्यावा या इच्छेने पैशांची बचत करतो. प्रसंगी भीक सुद्धा मागून एकराशे बाराशे रुपये घेऊन एका सराफाच्या दुकानात जातो. एका दुकानात तर त्यांचा वेष बघून त्यांना भिकारी समजून त्यांच्या हातावर एक रुपया ठेवून या दोघांना बाहेर सुद्धा काढलं जात. पण तेव्हा तरुण सराफा व्यावसायिक नीलेश खिवसाराची त्यांच्यावर नजर पडते आणि तो त्यांना आपल्या दुकानात घेऊन येतो.

या भाबड्या जोडीकडे तितके पैसे नाहीत पण त्यांना काय हवं याची त्याला जाणीव झाली असते. त्यामुळे तो आधी सहज चौकशी करतो आणि सोन्याची एक माळ आणि मंगळसूत्राची एक छोटी डबी देतो आणि त्यांच्याकडून फक्त वीस रुपये घेतो. मीच काय काल ज्यांनी ही पोस्ट बघितली असेल त्यांनी नीलेश खिवसाराचं कौतुक केले असेल. त्याला या दोघा वृद्ध दाम्पत्याकडून मिळालेल्या आशीर्वादासारखे आशीर्वादच दिले असतील. माझ्या मते या जगात दोनच जाती आहेत, त्या म्हणजे श्रीमंत आणि गरीब. त्यामुळे अर्थातच श्रीमंताविषयी द्वेष सुद्धा असू शकतो. पण तसं मुळीच नसतं. खरा प्रसंग आला तर ही मंडळी आपल्या मनात संपूर्ण समाजाबद्दल प्रेमाची, आपुलकीची, मदतीची भावना ठेवते हे एक मोठं उदाहरण म्हणून नीलेश खिवसाराने दाखवून दिलं आहे. हीच खरी आपल्या देशाची संस्कृती आहे.

**विजय शिंदे**/९४२०१९१५२२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ जून -**

माजी महसूल मंत्री व ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी शनिवार रात्री श्रीतुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.



मंदिर संस्थान कडून त्यांचा देवीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मंदिर संस्थान कडून ई-वाहन आणि डोलीद्वारे त्यांच्या दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे वारंवार दर्शनासाठी येणे होत नसल्याची खंत व्यक्त करत मंदिर संस्थान कडून झालेल्या व्यवस्थेमुळे छान दर्शन झाल्याचा अभिप्राय त्यांनी दिला.



## संक्षिप्त वृत्त...



### आर्य चाणक्य विद्यालयात योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके

**धाराशिव, दि.२२ जून -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रशालेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योग प्रात्यक्षिक करून योग दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. यानिमित्ताने योग शिक्षक खानवाटे यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे आरोग्य सुदृढ राहून अभ्यासात प्रगती करण्यासाठी तसेच तंदुरुस्त मन आणि बौद्धिक विकासासाठी योगासने नियमित करण्याचे आवश्यकता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार तसेच विविध योगासनांची प्रात्यक्षिकासह माहिती देऊन त्यांचे स्वास्थ्यासाठी दररोजच्या आयुष्यात किती महत्त्वाचे स्थान आहे, यावर विशेष माहिती सत्र ही झाले.



### नीट परीक्षेत ज्ञानेश्वरी भोरे हिचे सुयश

**शिराढोण, दि.२२ जून -**

कळंब तालुक्यातील एकुरका येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची माजी विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी सुंदर भोरे हिने नीट परीक्षेमध्ये ५७० गुण घेऊन उज्वल यश संपादन केले. त्याबद्दल शाळेच्या वतीने सत्कार करून प्रेरणेची थाप देण्यात आली. वडिलांचे छत्र हरवल्यानंतर सुद्धा अतिशय जिद्दीने अभ्यास करून ज्ञानेश्वरी ने हे यश मिळवलेले आहे. यामुळे परिवारासह ज्ञानेश्वरीचा शाळेचे मुख्याध्यापक बनसोडे यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेंद्र होसाळे, बळीराम निकम, जवाहर माळी, वसंत इंगळे, जनार्दन धुमाळे, सुषमा धुमाळ यांनी परिश्रम घेतले.

### बजरंग ताटे यांना आंबेडकरी लढवया योद्धा समाज भूषण पुरस्कार जाहीर

**कळंब, दि.२२ जून -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीने आंबेडकरी चळवळीतील योगदानाबद्दल



गेल्या ४१ वर्षापासून गायरान, वन जमीन नावावर करण्याचा प्रश्न तसेच आदिवासी पारधी यांचा गायरान, वन जमीन, निवासी अतिक्रमणाचा प्रश्न, विधवा महिलेचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, रोजगार, अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा, कार्यरत ठेवणारे श्रमिक मानवाधिकार संघाचे प्रमुख बजरंग ताटे (मानव अधिकार रक्षक) यांना छत्रपती शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. सदरील पुरस्कार दि.२६ जून रोजी ब.रा. वाघमारे (संस्थापक अध्यक्ष) अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स रुबी हॉल नवीन नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने मराठवाडा, विदर्भ विभागातील निवडक आंबेडकरवादी लढवया योद्धा यांचा गौरव करण्यात येणार आहे. सदरील पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



### वाडीवडगाव येथे जागतिक योग दिन साजरा

**लोहारा, दि.२२ जून -**

लोहारा तालुक्यातील वाडीवडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा उज्वला बचाटे, उपसरपंच अंकुश भुजबळ, शालेय समितीचे सर्व सदस्य, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक जीवनराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळे योगासने, प्राणायाम प्रकार घेण्यात आले. यावेळी शिवाजी बचाटे, निकेश बचाटे, अमोल भुजबळ, दत्तात्रय आनंदराव गिराम, ग्रामपंचायत सदस्य, आशा ताई, अंगणवाडी ताई, मुख्याध्यापक जीवनराव गायकवाड, शाळेतील शिक्षक शेख एम.एच., शेरकर एस.आर., कल्लेश्वर भुजबळ, शिंदे जी.एस., भोजने एम.ए. व विद्यार्थी उपस्थित होते.


### प्रा. सचिन सगरे यांच्या निवडीबद्दल सत्कार

**तुळजापूर, दि.२२ जून -**

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील सचिन सगरे यांची स्थापत्य विभाग प्रमुख म्हणून निवड झाली. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुहास गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा पवार काजल राठोड व इतर मान्यवर अभियांत्रिकी कॉलेज येथील स्टॉप उपस्थित होते.

# गजानन महाराज पालखीचे आज जिल्ह्यात आगमन

▶▶ मुखी हरिनामाच्या गजरासह गण गण गणात बोतेचा होणार जयघोष...... ▶▶ २५ जुनला पालखी सोहळा तेर नगरीत...



### २६ जुनला धाराशिव शहरात होणार श्रींचे स्वागत...

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२२ जून -**

टाळ व मृदंगांच्या तालावर मुखी हरिनामाच्या गजरासह बुलढाना जिल्ह्यातील शेगाव येथुन निघालेल्या पायी पालखी सोहळ्याचे आज (दि.२३) धाराशिव जिल्ह्यातील कळंब शहरात शेकडो वारकऱ्यांसह दाखल होत आहे. श्रींच्या पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यासाठी भावीकांकडुन जय्यत तयारी करण्यात आली आहे.

७०० वारककऱ्यांच्या लवाजम्यासह (दि.२) जुन रोजी पंढरपुरच्या दिशेने मार्गस्थ झालेल्या संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे तब्बल २१ दिवसाच्या पायी प्रवासानंतर सोमवारी धाराशिव जिल्ह्यात आगमन होणार आहे. पायी पालखी सोहळा बीड जिल्ह्यातील बोरी सावरगाव येथील मुक्कामानंतर गोटेगाव मार्गे धाराशिव जिल्ह्यातील कळंब शहरात सोमवारी (दि.२३) सायंकाळच्या सुमारास आगमन होत आहे. कळंब येथील मुक्काम. नंतर दि.२४ जून रोजी गोविंदपूर मार्गे तेरणा कारखाना ढोकी येथे सायंकाळच्या मुक्कामी दाखल होणार आहे. बुधवार दि.२५ जून रोजी वारकरी संप्रदायातील थोर संत संत शिरोमणी श्री संत गोरोबा काकांच्या तेर नगरीत सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास श्रींच्या पालखी सोहळ्याचे आगमन होणार आहे. गोरोबाकाका समाधी मंदिरासमोर एक ते दीड तासाच्या विसाव्यानंतर हा पालखी सोहळा हिंगळजवाडी मार्गे किणी (ता. धाराशिव) येथील दुपारचे जेवण करून उपळा (मा. ता. धाराशिव) येथे सायंकाळच्या सुमारास मुक्कामासाठी थांबेल.



गजानन महाराजांचा पालखी सोहळा गुरुवार दि.२६ जून रोजी धाराशिव शहरात दाखल होणार असून, दि.४ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास पंढरपुरात पोहोचणार आहे.

## शेलगावचे रोहित दिवाणे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२२ जून -**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून रोहित भाऊसाहेब दिवाणे यांना संगणक शास्त्रातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीने सन्मानित करण्यात आले.



श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिव संस्थेचे प्रशासकीय अधिकारी भाऊसाहेब दिवाणे यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव असून, परंडा येथील रा.गे. शिंदे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. डॉ. कविता ओझा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन प्रबंध सादर केला होता.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव संजय निंबाळकर, अध्यक्ष सुनील शिंदे, प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांच्यासह महाविद्यालयाच्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी रोहित दिवाणे यांचे अभिनंदन केले.

सध्या ते बेंगळुरूतील नामवंत कंपनीत कार्यरत असून त्यांच्या यशाने परंडा व शेलगाव दिवाणे (ता. कळंब) गावांचे नाव उज्वल झाले आहे.

## लोटस पोद्दार लर्न स्कूलचे ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ जून -**

९८ वर्षे परंपरा लाभलेल्या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांचे भविष्य निश्चितपणे उज्वल असल्याचे शिवसेनेचे उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी लोटस पोदार लर्न स्कुलच्या उदघाटन समारंभ कार्यक्रमात बोलतांना म्हटले.



दि. २१ जुन रोजी नळदुर्ग येथे राष्ट्रीय महामार्गालगत सुरु करण्यात आलेल्या लोटस पोदार लर्न स्कुलच्या उदघाटनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. माजी आमदात ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते या स्कुलचे उदघाटन करण्यात आले.

यावेळो बोलतांना चौगुले यांनी म्हटले की, शिक्षण ही केवळ पुस्तकी ज्ञानाची मर्यादा नसुन, विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास घडवणे हेच खरे शिक्षण आहे.

९८ वर्षांचा समृद्ध शैक्षणिक वारसा लाभलेल्या संस्थेच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी म्हटले की,या संस्थेचा अभ्यासक्रम जितका जुना आहे, तितकाच मुल्यशिक्षणावर आधारित शिक्षणपद्धतीचा ठसा येथे दिसतो. येथे केवळ गुण मिळवण्यावर नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या चारित्र्य, विचार व सामाजिक भावनांच्या विकासावर भर दिला जातो असेही चौगुले यांनी यावेळी बोलतांना म्हटले आहे.

या कार्यक्रमास शिवसेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुनिल चव्हाण, डॉ. भास्कर पाटील, विनायक (बंडु) पुदाले, अमृत पुदाले, नाना कुलकर्णी, उमरगा पोलिस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, उमरग्याचे नायब तहसिलदार सचिन बिराजदार, आनंदकुमार शहा, वागदरीच्या सरपंच तेजाबाई मिटकर, विशाल कोकरे, पद्मकर पाटील, प्रभाकर बिराजदार, बालाजी चव्हाण, उमाकांत मिटकर, बापु गायकवाड, राजेंद्र पुडले, अतुल पाटील, ज्योत्स्ना भोसले, जीवन जाधव, प्रिन्सिपल रेवती शिंदे आदीसह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ जून -**

उमरगा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे व लोहाऱ्याचे तहसिलदार रणजितसिंह कोळेकर यांचा लोहारा तालुका पोलीस पाटील संघाचे तालुकाध्यक्ष तानाजी माटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उमरग्याचे उपविभागीय अधिकारी गणेश पवार यांची पदवी होवून त्यांच्या जागी दत्तू शेवाळे यांची नियुक्ती झाली आहे.ते लोहारा येथील तहसिल कार्यालयाच्या सभागृहात महाराजस्व अभियान शिबिराचे करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती असणारे उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे व लोहाऱ्याचे तहसिलदार रणजितसिंह कोळेकर यांचा महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी निवासी नायब तहसिलदार रतन काजळे, लोहारा मंडळ अधिकारी बाळासाहेब बरनाळे, फणेपूर पोलीस पाटील भोजने, लोहारा खूर्द पोलीस पाटील बिरूदेव सुर्यवंशी, माळेगांव पोलीस पाटील बालाजी कदम, खेडचे पोलीस पाटील अमोल गव्हाळे यांच्यासह पोलीस पाटील उपस्थित होते.

## चिलवंत यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जून -**


धाराशिव येथील माजी नगरसेवक पृथ्वीराज चिलवंत यांचा मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ शाखा धाराशिवच्या वतीने स्मृती बुध्दविहार धाराशिव येथे वाढदिवस साजरा करण्यात आला.

सुरुवातीला तथागत बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण, पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण बनसोडे व मान्यवरांच्या हस्ते पृथ्वीराज चिलवंत यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

## डॉ. मुरहरी केळे यांना मराठी विषयात पीएच.डी. पदवी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जून -**

संत साहित्याचे अभ्यासक व त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. मुरहरी केळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.



निवडक मराठी साहित्यातील विजेचे चित्रण : एक अभ्यास या विषयावर त्यांनी संशोधन सादर केले असून, साहित्य, समाज, अध्यात्म आणि विज्ञान यांच्यातील विजेच्या संकल्पनेचा वेध घेतला आहे.

अभियांत्रिकी, कायदा, व्यवस्थापन, पत्रकारिता आदी १० पदव्या मिळवलेल्या डॉ. केळे यांनी यापूर्वी नागपूर विद्यापीठातून पॉवर डिस्ट्रीब्यूशन फ्रँचायसी या विषयावर पीएच.डी. प्राप्त केली होती.

या दुहेरी यशाबद्दल राज्यपाल, साहित्यिक, विद्यापीठ पदाधिकारी व वीज क्षेत्रातील सहकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत असून, मराठी साहित्यातील त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेतली जात आहे.

## सेवा सहयोग संस्थेची विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक; गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जून -**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणाऱ्या सेवा सहयोग संस्थेच्या 'विद्यार्थी विकास योजने'चा कार्यव्याप्तीचा विस्तार होत असून अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य उजळण्यास मदत होत आहे. धाराशिव जिल्ह्यातील अशा गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संस्थेचे जिल्हा प्रतिनिधी देवीदास पाठक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत दहावीमध्ये ९० टक्के, बारावीमध्ये ७० टक्के गुण मिळवलेले आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेत चांगल्या दर्जाच्या महाविद्यालयात प्रवेश मिळवणारे विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळवण्यास पात्र ठरतात. यामध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, नर्सिंग, आर्किटेक्चर, सीए, सीएस, आयसीडब्ल्यूए, फॅशन डिझायनिंग आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

२००८ साली ठाण्यात सुरू झालेल्या या उपक्रमातून गेल्या १७ वर्षांत देशभरातील ३६ जिल्ह्यांतील २३९६ विद्यार्थ्यांना तब्बल २७ कोटी ३१ लाख रुपयांची शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात संस्थेने १०३१ विद्यार्थ्यांना ६ कोटी २५ लाखांची शैक्षणिक मदत केली आहे. आतापर्यंत १३६४ विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले असून १०३२ विद्यार्थी सध्या शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या वतीने गुणवत्ता आणि गरज हे दोन प्रमुख निकष ठेवून मदतीचे वाटप होते. मदत मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी ५४ टक्के मुले व ४६ टक्के मुली आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय असून ३७ टक्के विद्यार्थी ग्रामीण, २० टक्के अर्धनागरी व ४३ टक्के शहरी भागातील आहेत.

## खामसवाडीत रस्त्यावरील अस्ताव्यस्त दुचाकी पार्किंगमुळे वाहतूक विस्कळीत



### पोलिस प्रशासनाचा धाक शून्य!

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२२ जून -**

खामसवाडीत मुख्य रस्त्यावरील अस्ताव्यस्त दुचाकी पार्किंगमुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले असून मोठ्या वाहनांच्या वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. महिलांना, वृद्ध नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना देखील याचा फटका बसत असून, रस्त्यावर चालणेही अवघड झाले आहे.

गावचे सरपंच अमोल पाटील यांनी काही महिन्यांपूर्वी धाडसाने अतिक्रमण मुक्ती मोहीम राबवून रस्त्यांचे रूंदीकरण केले होते. त्यामुळे एसटी बससेवा, मालवाहतूक ट्रक गावात येऊ लागले होते. मात्र दुचाकीस्वारांकडून पुन्हा रस्त्यावर बेधडकपणे गाड्या उभ्या केल्या जात असल्याने वाहतूक विस्कळीत झाली असून एसटी बसेस गावात येणे बंद झाले आहे.

रस्त्याच्या कडेला दुचाकी लावण्यासाठी मार्किंग लाइन आखून देण्यात आली होती, तरीही नियमांची पायमल्ली केली जात आहे. एसटी चालकांनी अनेकदा रस्ता मोकळा करण्याच्या सूचना दिल्या, पण काही हुल्लड दारुड्यांनी त्यांनाच शिवीगाळ केल्याचे निदर्शनास आले. परिणामी गावात येणाऱ्या एसटी सेवा बंद झाल्याने वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांना चालत प्रवास करावा लागत आहे.

गावात सिद्धीविनायक ग्रीनटेक कारखान्यामुळे मोठ्या प्रमाणावर अवजड वाहने ये-जा करतात. महाराष्ट्र ग्रामीण बँक, डीसीसी बँक, व्यापारी वसाहत, पतसंस्था आदींमुळे रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते. विशेषतः साठे चौक हा 'डेंजर झोन' बनत चालला आहे, जिथे अवजड ट्रॅक्टर, ऊस वाहतूक करणारी वाहने आणि दुचाकीस्वार यांच्यात अपघाताची शक्यता वाढली आहे.

**▶▶ कायद्याची भीतीच राहिली नाही?**

शिराढोण पोलीस स्टेशनने अनेकदा सूचना दिल्या, पण पोलिसांचा धाकच राहिलेला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तु कर भिल्यावणी, मी करतो पळल्यावणी अशा बिनधास्त वृत्तीचे काही युवक सर्रास नियम मोडत असून, नव्या वाहनचालकांशी वाद घालण्यासही मागेपुढे पाहत नाहीत.

**▶▶ उपाययोजना होणार का?**

गावातील नागरिकांनी प्रशासनाकडे पोलिसांचा ठोस बंदोबस्त, दंडात्मक कारवाई व वाहतुकीसाठी जागरूकता मोहीम राबवण्याची मागणी केली आहे. अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाऊन गंभीर स्वरूप धारण करू शकते, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी लोक प्रतिनिधी म्हणून मी कायम तत्पर- आ.बबनराव लोणीकर

## ग्रामीण भागातील शेवटच्या सर्वसाधारण माणसासाठी काम करणारा मी कार्यकर्ता; दिवस रात्र जनसामान्यांसाठी काम करतो म्हणून सर्वसामान्य जनता माझ्या पाठीशी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारा रस्ता वीज पाणी या मूलभूत बाबी उपलब्ध करून देण्यासाठी मी या अगोदरही सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत यापुढे देखील सर्वांगीण विकासासाठी मी लोकप्रतिनिधी म्हणून सदैव तत्पर असेल. गावाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी गावाला दर्जेदार रस्ता असणे अत्यंत आवश्यक आहे दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाली तर निश्चितपणे गावाच्या विकासाला हातभार लागतो त्याचबरोबर गावासाठी मुबलक फिल्टरचे शुद्ध पिण्याचे आणि मुबलक वीज मिळावी यासाठी देखील मी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

ढोकसाळ, वाघोडा तांडा, बोरगाव व ढगी या गावांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते यावेळी पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार व राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार यांच्या माध्यमातून अनेक लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत असून या सर्व योजनांचा फायदा सर्वसामान्य लोकांना मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सातत्याने प्रयत्न केले पाहिजे. केंद्र व



राज्य सरकारच्या अनेक योजनांचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना झाल्यास निश्चितपणे ते पाठीशी राहतात त्याचबरोबर राजकारणात काम करत असताना प्रत्येक कार्यकर्त्याने आपण सर्वसामान्य नागरिकांना किती सुविधा उपलब्ध करून देऊ शकतो यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहेत यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, निवडणुकीपूर्वीच ग्रामीण भागाच्या रस्त्यांच्या संदर्भाने ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून ठेवलेला होता त्या कामाचे उद्घाटन आज आपण या ठिकाणी करत आहोत.

गावाला दर्जेदार रस्ता मिळाला तर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मदत होऊ शकते ही बाब लक्षात घेऊन अनेक दिवसांची मागणी असलेला ढोकसाळ- वाघोडा तांडा- वाघोडा- वरुड रस्त्यासाठी ९ कोटी ५९ लक्ष रुपये तर ढगी -बोर-गाव रस्त्यासाठी ७ कोटी ९५ लाख रुपये मंजूर करण्यात आले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसासाठी काम करणारा मी कार्यकर्ता असून त्यामुळेच मागील ४० वर्षापासून सर्वसामान्य जनता माझ्यासोबत आहे ८ वेळा निवडणूक लढवलेली असताना ५ वेळा याच सर्वसामान्य लोकांमुळे मला विजय प्राप्त झाला त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची सेवा प्रत्येक राजकीय पदाधिकाऱ्याने करणे अपेक्षित असून लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने मी या सर्वसामान्य नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी आहे मतदारसंघातील सर्वच गाववाडी वस्ती तांडा या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशीश कयंदे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता श्री कोल्हे उपाभियंता श्री मस्के सुरेश ढाकणे विकास विठ्ठल घुले तानाजी केंद्रे प्रल्हाद बोंढारे मुंजाभाऊ कोकाटे सुरेश राठोड सचिन सांगळे श्याम केंद्रे सुभाष घुले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### शेतकऱ्याची विहीरीत उडी घेऊन आत्महत्या



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन लगत असलेल्या भोकरदन नांजा शिवारातील गट क्र. ८३ मध्ये रविवारी सकाळी अकराच्या दरम्यान एका विहारीत एका पुरुष जातीचे मृतदेह आढळून आल्याची घटना घडली आहे फकिरा अंबादास पुंड(५३) असे मयता चे नाव आहे.

दरम्यान रविवारी शेजारील शेतकरी हे पेरणी करिता आले असता विहरीकडून प्रचंड दुर्गंधी चा वास येत असल्याने त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह तरंगत असल्याचे दिसून आले होते दरम्यान संबंधित शेती मालक यांना घटनेची माहिती दिली असता मृत व्यक्ती ची पत्नी घटनास्थळी पाहणी केली अंगातील कपड्याच्या वर्णा वरून त्यांच्या पती चा असल्याचे समजले होते त्यांच्या पत्नी ने शर्ट आणि बूट घातलेल्या वरणामुळे लक्षात आले होते.सदरील मृतदेह शहरातील म्हाडा परिसरात वास्तव्यास असलेल्या शेतकरी फकिरा अंबादास पुंड (५३) यांचा असल्याचे सिंष्पन्न झाले असता तातडीने भोकरदन पोलिसात खबर दिली त्यावर भोकरदन बिट जामदार बी टी सहाणे व पो कॉ. रानगोते यांनी घटनास्थळ वर स्थानिकांच्या मदतीने मृतदेह वर काढून पंचनामा केला व तर मृतदेहाचे उत्तर तपासणी साठी हलविणे योग्य नसल्याने घटना स्थळी डॉ.किरण सावंत व सहकारी रितेश देशमुख जागीच तपासणी करून पार्थिव नातेवाईकांना स्वधीन केले होते. यावर त्यांच्या घरच्यानीं माहिती दिली कि हे बुधवारी ता. १८ ला घरात पंढरपूर वारीला जाऊन येत असल्याचे परिवाराला सांगून घरात तुन निघून गेले होते. यांच्या पच्छात पत्नी एक मुलगी दोन मुल असा परिवार आहे पुंड यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाचच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले होते तर मृत्यूचे कारण कळू शकले नव्हते.

### अकराव्या जागतिक योग दिनानिमित्त आ.संतोष पाटील दानवे यांच्या वतीने योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

येथील प्रियदर्शनी वस्तीगृहाच्या मैदानावर दिनांक २१ जून २०२५ रोजी सकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत अकराव्या जागतिक योग दिनानिमित्त एक दिवसीय योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन पंचायती राज समितीचे अध्यक्ष आणि आमदार मा. संतोष पाटील दानवे यांच्या वतीने करण्यात आले होते.

या शिबिराचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने सकाळी ५.३० वाजता करण्यात आला, तर समारोप सकाळी ७ वाजता संपन्न झाला.

योग गुरु श्री. कमलाकर राव इंगळे सर यांनी या शिबिरात मार्गदर्शन केले. त्यांनी योगासने, श्वसन क्रिया आणि ध्यान यांचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देत उपस्थितांना योगाचे महत्व सांगितले.

या योग शिबिरात भारतीय जनता पक्षाचे शहरातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, डॉक्टर्स, वकील, अभियंते तसेच अनेक प्रतिष्ठित व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

सदर उपक्रमामुळे शहरामध्येल आरोग्याविषयी जागरूकता वाढीस लागून योग दिनाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित झाले.

## शिवसेना (उबाठा) गटाच्या जिल्हाध्यक्षपदी महेश नळगे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



शिवसेना पक्ष प्रमुख मा . उद्धव ठाकरे यांनी युवा नेते महेश नळगे यांच्या कामांची दखल घेत जालना जिल्हा अध्यक्षपदी निवड केली . राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर जिल्ह्यातील रिक्त झालेल्या जागेवर शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख पदावर रस्सीखेच सुरूच होती अखेर शिवसेना उबाठा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी जिल्ह्यात युवकांची मोठी फळी निर्माण करून शिवसेना उबाठा पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या महेश नळगे यांची जालना जिल्हा प्रमुख पदी निवड केल्याचे सामना वृत्तमान पत्रातून जाहीर केले. या निवडीचे जिल्हाभरात फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोषात जोरदार स्वागत करण्यात आले. मागील अनेक महिन्यापासून जालना जिल्ह्यात शिवसेना उबाठा पक्षाच्या जिल्हा प्रमुख कोण होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या पक्षांतर्गत पदाधिकारी यांनी जिल्हाप्रमुख पदावर आपली दावेदारी व्यक्त केली केली होती होती प पण पक्षाने जिल्ह्यातील व मराठवाड्यातील शिवसेना उबाठा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना विचारत घेऊन महेश नळगे यांची निवड केली. पक्ष प्रमुखांसह पक्षातील वरिष्ठ नेतेमंडळी यांनी माझ्यावर जिल्हाअध्यक्ष पदाची निवड केली ती माझ्या कामाची पावती आहे . जिल्हयात गट तट न करता संबंध जिल्ह्यातील जणतेच्या शिवसेनेच्या माध्यमातून पक्षाला मजबूत करण्याचे काम करणार आपल्याचे दै . तरुण भारत च्या प्रतिनिधींना बोलताना सांगितले .

## शिवसेना (उबाठा) पक्षाच्या मंठा तालुकाप्रमुखपदी प्रदीप बोराडे

### जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भगवा फडकणार -प्रदीप बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून नगरसेवक तथा माजी पंचायत समिती सदस्य प्रदीप दत्तराव बोराडे यांची मंठा तालुका शिवसेनाप्रमुख म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर मंठा तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. मात्र, प्रदीप बोराडे हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षासाठी ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हा दिलेला विचार अंगीकारून राजकारणाबरोबरच सामाजिक कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. शिवसेनेने त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची शिवसेनेच्या मंठा तालुकाप्रमुख पदी नियुक्ती केली आहे. मंठा तालुका शिवसेनामय करणार असे तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी सांगितले. त्यांच्या या नियुक्तीचे मंठा तालुक्यातील शिवसैनिकांनी फटाके वाजवून स्वागत केले. शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खा. संजय जाधव आणि जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वाखाली मंठा तालुक्यात आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविणार असे नवनियुक्त शिवसेना तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी सांगितले. आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहनही त्यांनी केले.

## गोंदी पोलीसांकडून महामार्गावर रॉबरी करणारे दोन आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील पोलीस ठाणे गोंदी हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरती ट्रक चालक लालसिंग अहीरवार हा कंपनिची ट्रक क्रमांक चक२०उए४१०६ यात कंपनीचे सामान घेउन बिदर येथे घेउन जात असताना त्यात महामार्गावर महाकाळा येथे दोन अज्ञात व्यक्तींनी हात करून थांबण्याचा इशारा केला. ट्रक चालकाने ट्रक थांबविल्यानंतर त्या व्यक्तींनी त्याच्या डोळयात काहीतरी टाकून त्यास ट्रक मधून खाली ओढून त्यास मारहाण केली व ट्रक हा मालासह पळवून नेला. गोंदी पोलीसांना याची माहीती मिळताच गोंदी पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जाउन ट्रक चालक लालसिंग अहीरवार यास सरकारी दवाखाना येथे औषध-उपचारा करीता दाखल केले व त्यानंतर ट्रकचोरून घेउन जाणारे इसम नामे बंडू ऊर्फ रामेश्वर भिमराव वाघमारे रा. महाकाळा व समाधान बबन बेद्रे रा. अंकूश नगर यांना ताब्यात घेउन त्यांच्याकडून गुन्हयातील गेला माल ट्रक व कंपनिचा माल असे एकूण ३६,३३,११५ रूचा त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेला आहे. त्यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन गोंदी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक, श्री अजयकुमार बंसल साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक, आयूष नोपाणी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, श्री विशाल खांबे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक किरण हावले, पोहेकॉ रामदास केंद्रे, पोकों शाकिरोद्दीन सिध्दीकी, चालक पोलीस कॉन्स्टेबल वैद्य सर्व पोलीस ठाणे गोंदी यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक किरण हावले हे करीत आहेत.

## शिष्यवृत्तीधारकांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाडीबीटी पोर्टलवरील राईट टु गीव्ह अप या पर्यायाचे बटण नजरचुकीने अथवा अनावधानाने निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रिन्सिपल लॉगीनला महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मधील राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांकडून पोर्टलवर नजर चुकीने अथवा अनावधानाने राईट टु गीव्ह अप पर्याय निवडला गेला आहे, अशा विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयांच्या प्राचार्य लॉगीन मधून रिव्हर्ट राईट टु गीव्ह अप या पर्यायाचा वापर करुन आपला अर्ज दि.३० जुन २०२५ पुर्वी रिव्हर्ट बॅक करुन घेणे आवश्यक आहे. तसेच ठर्शींशीं लरलझ झालेला अर्ज देखील विहीत वेळेत म्हणजेच दि. ३० जुन २०२५ पुर्वी विद्यार्थ्यांने त्यांच्या लॉगीनमधून ऑनलाईन रित्याच फेरसादर करणे आवश्यक आहे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजु एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## गुंडेवाडी शिवारात जुगार अड्डावर छापा; ११ आरोपी ताब्यात, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांनी जालना जिल्ह्यातील जुगार अड्डावर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या. दिनांक २१/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना खबऱ्या मार्फत गुंडेवाडी शिवारातील मधुकर निकाळजे याचे शेतामध्ये जुगार अड्डा सुरु असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सायंकाळी १९:३० वाजता तांदुळवाडी खुर्द शिवार गट नं. २७ मधील मधुकर मोहनराव निकाळजे यांचे शेतामध्ये चालु असलेल्या जुगार अड्डयावर अचानक छापा मारला आहे. त्याठिकाणी पत्र्याच्या शेडसमोर मोकळ्या जागेवर गोलाकार लावलेल्या टेबलावर १) नारायण भगवान काळे वय ३८वर्ष रा. पोकळवडगाव ता. जालना २) संतोष शंकर काळे वय ३५वर्ष रा. संजयनगर देऊळगाव राजा जि. बुलडाणा ३) बाळु संपतराव वाघमारे वय २७ वर्ष रा. पीर पिंपळगाव ता. जि. जालना ४ ) शेख ईस्माईल शेख इसा वय ४० वर्ष रा. पीर पिंपळगाव ता. जि. जालना ५) बबन माधवराव म्हस्के वय ५५ वर्ष रा. माळशेंद्रा ता. जि. जालना ६) राजन छगन वाघमारे वय ४८ वर्ष रा. खडकपुरा देऊळगाव राजा ७) गोरख गुलाबा आढे वय ४० वर्ष रा. मोहाडी तांडा ता. जि. जालना ८) जावेदखान मोहंमद खान वय ४५ वर्ष रा. गारखेडा सुतगिरणी छत्रपती संभाजीनगर ९) प्रकाश आगाजी वाहुळे वय ५८ वर्ष रा. दरेगाव ता. जि. जालना १० ) संदीप नारायण चव्हाण वय ४३ वर्ष रा. आडगावराजा जि. बुलडाणा ११ ) प्रदीपकुमार अर्जुनराव तांबिले वय ५७ वर्ष रा. डोणगाव ता. जाफ्राबाद जि. जालना यांना ताब्यात घेण्यात आले असुन, त्यांचेकडील रोख रक्कम व जुगार साहित्य, तसेच घटनास्थळावरील वाहने असा एकुण ३४,०८,५२४ /- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी विरुद्ध सपोनि. योगेश उबाळे, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. श्री. योगेश उबाळे, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, भाऊराव गायके, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे, प्रशांत लोखंडे, लक्ष्मीकांत आडेप, संभाजी तनपुरे,, रमेश काळे, कैलास चेके, योगेश सहाने, धिरज भोसले,सोपान क्षीरसागर, अशोक जाधवर सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

## बस स्टँड मधील चोरवाटामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढले!

### बस स्थानक प्रशासनाची जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा येथील बस स्थानकात बस मध्ये चढणाऱ्या प्रवासी महिलेच्या पर्समधून अडीच लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केल्याची घटना शनिवार रोजी दुपारी घडली आहे. बस स्थानकाला असलेल्या आजूबाजूला चोर वाटा यामुळे मंठा बस स्थानकातील चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे या चोर वाटा बंद करण्यात यावे अशी मागणी देखील मागील महिन्यामध्ये प्रवासी व नागरिकांनी केली होती परंतु बस स्थानक प्रशासन व परिवहन मंडळ याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांना व प्रवाशांना या अशा अप्रिय गोष्टींना सामोरे जावे लागत आहे.

प्रवासी महिला (ता.२१) शनिवार रोजी दुपारच्या वेळी आपल्या मंठ्याहुन सेनगावकडे गावी जाण्यासाठी बसमध्ये चढतांना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधून सोन्याची मनी पोत , गहू पोत , कानातील रिंग , चांदीचे कडे जोड , कोपऱ्याचे जोड असे एकूण २ लाख ५६ हजार पाचशे रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. सदर दागिने लंपास करून चोर चोरवाटातून तात्काळ पळून गेले. या चोर वाटा बंद केले असते तर चोरांना बस स्थानकातून पळता आले नसते. गोष्टींना बस स्थानक प्रशासन जबाबदार असल्याचे प्रवासी नागरिकांतून बोलले जात आहे. याप्रकरणी अलका रवी गोडसे वय ४५ वर्ष राहणार सेनगाव जिल्हा हिंगोली यांच्या फिर्यादीवरून मंठा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पावसाची दडी; शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे सावट..

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२२ जून -**

हिमायतनगर परिसरात अवकाळी पाऊस दमदार स्वरूपाचा झाल्याने जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाली. मृग नक्षत्रातही प्रारंभी चांगला पाऊस झाला. त्यामुळे बहुतांशी शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील कापूस, तूर, सोयाबीन, मूग, उडीद व हळदीची लागवड केली. बहुतांशी शेतकऱ्यांच्या पिकांची उगवणही योग्य प्रमाणात झाली मात्र मागील आठ- दहा दिवसांपासून पावसाने दडी मारली. परिणामी उगवलेली कोवळी पिके माना



टाकत असल्याने करपून जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

मृग नक्षत्रात खरीप हंगामातील पिकाची पेरणी केल्याने त्या पिकापासून शेतकऱ्यांना समाधानकारक उत्पादन मिळेल व अनेकांची स्वप्न साकार होतील, ही अपेक्षा बहुतांशी शेतकरी उरास बाळगुन.

खरीप हंगामाच्या पूर्वसंध्येला मृग नक्षत्रातच पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे यंदा मृग नक्षत्रात खरीप हंगामाची पेरणी होऊन पेरलेल्या पिकाची उगवणही चांगल्या पद्धतीने होईल व त्यापासून आपण चांगले उत्पादन मिळेल. हे स्वप्न बघू पाहणाऱ्या अनेक शेतकऱ्यांना आता मात्र पावसाने दडी मारल्याने काळजाचा ठोका वाढला आहे तर काही शेतकऱ्यांना सोयाबीनच्या बोगस बियाणांचा फटका बसला आहे.

परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, हळद पिकाची पेरणी व लागवड केली.२२ बहुतांश शेतकऱ्यांच्या पिकाची उगवणही चांगली झाली असली तरी मागील आठ दहा दिवसांपासून पावसाने दडी मारली. परिणामी उगवलेली कोवळी पिके उनधरून माना टाकत असल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट घोंगावताना दिसत आहे.

# मुदखेड शहरात अनेक ठिकाणी जागतिक योग दिन साजरा



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२२ जून -**

दि.२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने शहरात व तालुक्यात ठिकठिकाणी योग दिन साजरा करण्यात आला आहे.

यामध्ये सेंट्रल रिझर्व्ह पोलिस दलाच्या मध्य प्रशिक्षण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला आहे. यावर्षी योग दिनाची थीम पृथ्वी, योगासाठी योग होती. या कार्यक्रमाचे उद्घाटन पोलिस प्राचार्य व पोलिस महासंचालक ख्वाजा सजनउद्दीन यांनी केले. यावेळी कमांडंट व्ही. पी. त्रिपाठी, डेप्युटी कमांडंट अरुण कुमार, सहाय्यक कमांडंट हरीशंकर प्रसाद, करनजित सिंग, यू.टी. संस्थेचे अनेक अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते, ज्यात साकरे (मंत्रालयिक), वैद्यकीय अधिकारी डॉ. संजीवन यांचाही समावेश होता.

मुदखेड येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, दिलीप पवार, रमेश सावंत, गणेश वड्डे, मोहन कवळे, शशीकांत पवूळ,सचिन चुंचे, आकाश बोकेफोड,पिराजी जगताप, कृष्णा बोकेफोड, सुनील माळी,व इतर नगर परिषद कर्मचारी यांनी योग दिन साजरा केला आहे. व तसेच बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित स्वातंत्र्य सेनानी राजाराम बापू माध्यमिक शाळा व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवार, प्राचार्य हेमंत इंगळे,सहशिक्षक डॉ. पंजाब शिंदे, परशुराम माने, मनोहर ओसावार, कैलास कपाटे, कैलास खानसोळे ,संभाजी,रावते बाळासाहेब पवार, बापूसराव केंद्रे, गोकुळ चव्हाण, प्रकाश फाजगे, मनोहर गोळेगावकर, भगवान कदम ,भगवान राजेगोरे,दत्ता रेड्डी,अनिल महाद्वाड, शिवप्रसाद चेडगुलवार,गजानन वाळके, परमेश्वर गव्हाणे,राजेश गोवंदे, विष्णू भुरके,राहुल सोनटक्के, सौ.विना कदम,सौ रुपाली आडगावकर,सौ जयमाला सावंत, सौ.अनिता पाटील सौ.कवळे मॅडम व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल मुदखेड येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनीता भंगीरे,पवार टी बी, व शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### सतीश निखाते यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**लोहा** -राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा शहरातील तरुण कार्यकर्ते व आंबेडकरी चळवळीतील युवा सामाजिक कार्यकर्ते सतीश निखाते यांचा वाढदिवस विविध उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेस (आजित पवार ) गटाचे युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार, माजी नगरसेवक जीवन पाटील चव्हाण, सूर्यकांत पाटील गायकवाड, सतिश निखाते, पत्रकार डी. एन. कांबळे, रिपाईचे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे, पत्रकार बापू गायखर, नारायणराव निखाते आदींची उपस्थिती होती. लोहा उपजिल्हा रुग्णालयात सतीश निखाते मित्र मंडळाच्या वतीने रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. तसेच शहरातील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांनी सतीश निखाते यांचे वाढदिवसानिमित्त पुष्पहार घालून अभिष्टचिंतन केले. यानंतर रक्तदान शिबिरास प्रारंभ करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून मागील पाच वर्षांपासून निखाते मित्रमंडळांकडून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या वर्षी ५१ तरुणांनी रक्तदान शिबिरात उस्फुर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मनोज गडसिंग, हटकर, संतोष भोळे, प्रसाद हांडे, चिकू महाबळे, सोनू महाबळे, संजय महाबळे, विशाल महाबळे, चंद्रकांत बुध्दे, रणजीत निखाते तसेच नांदेड येथील रक्तपेढी कर्मचाऱ्यांनीही अथक परिश्रम घेतले.

### प्रगती माध्यमिक विद्यालयात योग दिन साजरा

**हाणेगाव** -देगलूर तालुक्यातील प्रगती माध्यमिक विद्यालय सुगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे अवचित साधून शनिवार दिनांक २१ रोजी



योगाचे प्रत्यक्ष सादरीकरण करून योग दिन साजरा करण्यात आलाय याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रशिक्षक तथा सहशिक्षक बालाजी नाईकवाडे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे प्रत्यक्ष सादरीकरण करून दाखवून योगाचे महत्त्व पटवून दिले आहे.. तर प्रति दिवस योगसाधनामुळे शरीर निरोगी , सुदृढ, लवचिक, तणामुक्त, त्याबरोबरच शरीराचा सर्वांगीण विकास होतो असे यावेळी सांगण्यात आले. सदरील योग शिबिरात विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी मोठ्या संख्येने नोंदवला होता. याप्रसंगी विद्यालयाचे सहशिक्षक प्रल्हाद सांडवे, सुरेश कदम, लक्ष्मण भेंडेगावे, फजल मुल्ला, व्यंकट गडपवार, मकरंद पाटील, विलास टिपराळे, शिक्षकेतर कर्मचारी बापूराव पाटील, शिवाजी देवकते, उत्तम पवार, बसवराज शेटकर, अंबादास बामणे, गुणवंत पाटील यांचा सहभाग होता.

### हर्षवर्धन देशमुखचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश

**निवघा बा.**- हदगाव तालुक्यातील मौजे उंचेगाव (खु.) येथिल रहिवाशी गोकुळनाथ उच्च माध्यमिक विद्याल्याचा विद्यार्थी हर्षवर्धन



गजानन देशमुख याने मे २०२५ मध्ये झालेल्या एमएचटी-सीईटी परिक्षेत ९५.८८ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. एमएचटी-सीईटी परिक्षेअंतर्गत पीसीबी ग्रुप परिक्षेचा निकाल मंगळवारी जाहिर झाला. त्यामध्ये उंचेगाव (खु.) येथिल मुळचा रहिवाशी असलेल्या व गोकुळनाथ उच्च माध्यमिक विद्यालय पिंगळी ता. परभणी येथे शिकणारा हर्षवर्धन गजानन देशमुख याने दिद्दीने ९५.८८ टक्के गुण घेत यश संपादन केले. त्याच्या यशाबद्दल शिवसेना नेते माजी खासदार सुभाष वानखेडे यांच्यासह नातेवाईक, ग्रामस्थ व सर्व स्तरातून हर्षवर्धन वर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### नायगावचा यश पांढरे याचे राज्यस्तरीय CET परीक्षेत घवघवीत यश



**नायगाव** -येथील यश विनोद पांढरे या कुशाग्र विद्यार्थ्याने MH-CET (JQ>-G) या राज्यस्तरीय प्रवेश परीक्षेत ९७.०० टक्के गुण मिळवत एक उज्ज्वल शैक्षणिक कामगिरी बजावली आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे नायगावसह संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे नाव उजळले आहे. यशच्या या उत्तुंग यशाबद्दल नांदेडमधील कोचिंग क्लासेस, शिक्षक, मित्रपरिवार व ग्रामस्थांमधून त्याचे मनः पूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

# यूपीएससीतील यशस्वी उमेदवार अनुराग बारापत्रे यांचा नागरी सत्कार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२२ जून -**

देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षेत यश मिळवून असिस्टंट कमांडंट पदावर नियुक्ती मिळवणाऱ्या अनुराग बारापत्रे यांचा भव्य नागरी सत्कार दिनांक २१ जून रोजी सायंकाळी ६ वाजता गजानन महाराज मंदिर मंगल कार्यालय, किनवट येथे आयोजित करण्यात आला. हा गौरव सोहळा त्यांच्या यशाचा सन्मान करणारा आणि अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार भीमराव केराम होते. त्यांच्या हस्ते तसेच संपूर्ण बारापत्रे कुटुंबाच्या वतीने अनुराग बारापत्रे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार केराम यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अनुराग हा आमच्या भागातील पहिला यूपीएससी यशस्वी विद्यार्थी आहे, याचा मला अत्यंत अभिमान वाटतो. चिकाटी, जिद्द आणि सातत्याने अभ्यास केल्यास कोणतीही परीक्षा कठीण राहत नाही.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अनुराग बारापत्रे यांनी सांगितले, मी यूपीएससी, एमपीएससी, राज्यसेवा, कंबाईन अशा अनेक परीक्षा वेळोवेळी दिल्या. अपयश आलं, तरी खचून न जाता आत्मपरीक्षण केलं. चुका दुरुस्त करत सतत प्रयत्न केल्यामुळेच आज हे यश मिळवता आलं. यामागे माझ्या कुटुंबीयांचा, शिक्षकांचा आणि मित्रपरिवाराचा मोठा वाटा आहे.

कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, श्रीनिवास नेम्मानिवार, रमेश बद्दीवार, साजिद खान, अभय महाजन, संतोष पेटकुले,पो.उ.नि. फडेवार, कॉस्मोपॉलिटन शिक्षण संस्थेचे सचिव प्रल्हादराव रामतीर्थकर, अध्यक्ष नामदेवराव रामतीर्थकर, बाला मोहिते, उत्तम कानिंदे, अनिल पाटील कराळे, शिवसेनेचे मारुती दिवसे पाटील, युवा नेते प्रशांत कोरडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन बाळकृष्ण कदम यांनी केले.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी रमेश बारापत्रे, योगिता बारापत्रे, गजानन अगरमोरे, चंद्रकांत अन्नापुरे, सारंग माने, पवन रावते व संपूर्ण बारापत्रे परिवार आणि मित्रमंडळींनी विशेष मेहनत घेतली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे वृत्तपत्र वाचन कट्ट्याचा शुभारंभ



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२२ जून -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे दिनांक २२ जून २०२५ रोज रविवारी वर्तमानपत्र वाचन कट्ट्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसरातील समाज बांधवांची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे सकाळी वंदनेस आलेल्या समाज बांधवांना परिसरातील सामाजिक, राजकीय, शासकीय घटना घडामोडी विविध माध्यमातील वृत्तपत्रातुन वाचण्यात याव्या ही बाब लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे वृत्तपत्र वाचन कट्टा २२ जून रोजी शुभारंभ करण्यात आला.यावेळी सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे, राजू लांडगे, प्रसेनजीत वाघमारे, प्रदीप हनवते, आकाश सोनकांबळे, भगवान वाडे, बबन गायकवाड, अशोक वाडे, रामचंद्र जमदाडे, पांडुरंग वाडे, सूर्यकांत सोनसाळे, रामराव सरपाते, अरविंद जोंधळे, सुनील वडगावकर, बालाजी गायकवाड, हरी कसबे इत्यादींची उपस्थिती होती.तर यावेळी हा वाचन कट्टा हे सहभागातून हा कट्टा चालवण्याच्या निर्णय घेण्यात आला व आजपासुन पुढील दात्यानी वृत्तपत्र वाचन कट्ट्यास दान देण्याची जबाबदारी स्वीकारली यामध्ये विलास गजभारे यांनी दै. पुण्यनगरी, राजु लांडगे - दै. गोदातीर समाचार,दै. सत्यप्रभा, प्रदीप हानवते - दै.प्रजावाणी, प्रसेनजीत वाघमारे - दै.सम्राट, डि.के. कांबळे - दै.देशोन्नती, सम्राट आढाव - दै.तरूण भारत, आकाश सोनकांबळे - दै. लोकमत वरील सर्व वृत्तपत्रे दात्यानी वाचनासाठी उपलब्ध करून दिले आहेत. तरी परिसरातील जेष्ठ नागरिकांनी सदरील वाचन कट्ट्याचा लाभ घ्यावा अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको यांच्यावतीने दिली आहे.

# डॉ. सुरेश सावंत यांचा आ. प्रतापराव पाटील चिखलीकरांकडून सन्मान



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२२ जून -**

साहित्य विश्वातील सर्वोच्च सन्मान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा नुकतीच करण्यात आली असून या पुरस्कारासाठी नांदेड येथील ज्येष्ठ लेखक तथा बालकवी डॉ. सुरेश सावंत यांच्या आभाळमाया या कवितासंग्रहाची निवड करण्यात आली आहे. डॉ . सुरेश सावंत यांच्या रूपाने नांदेडच्या साहित्य विश्वात आणि जिल्ह्याच्या सन्मानात आणखीन एक मानाचा तुरा रोवल्या गेला आहे. त्यामुळे डॉ. सुरेश सावंत यांचा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते साई सुभाष या संपर्क कार्यालयात आज सन्मान करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, रामदास पाटील सुमठाणकर ,माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे , माजी आमदार अविनाश घाटे , माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा , जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर , यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# धरती आबा जनभागीदारी अभियानाचा लाभ घ्यावा : तहसीलदार काकडे

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.२२ जून -**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार १५ ते ३० जून २०२५ या कालावधीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील एक महत्त्वपूर्ण अभियान 'प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत जनभागीदारी अभियान राबविण्यात येत असून, दि. १६ जून रोजी तालुक्यातील मौजे मच्छिंद्र पाथर्डी येथे तहसीलदार मुगाजी काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरील अभियान मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. यावेळी तहसीलदार काकडे यांचे उत्साहात स्वागत करतांना ग्रामस्थांनी त्यांना बळीराजाचे पारंपारिक वाहन बैलगाडीतून सफारी घडवून आणत त्यांचा ढोल ताशाच्या गजरात भव्य हृदय सत्कार केला. यावेळी बोलताना



तहसिलदार काकडे यांनी,'आदिवासी लाभार्थी, शालेय विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहभागी होऊन 'धरती आबा जनभागीदारी अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार मुगाजी काकडे यांनी केले.

तहसीलदार मुगाजी काकडे पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले कि, जनजातीय गौरव वर्षानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०२४ रोजी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाची सुरुवात केली आहे. केंद्र शासनाचा हा महत्त्वकांक्षी उपक्रम असून या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी बहुल भागांमध्ये पायाभूत सुविधा, वैयक्तिक स्वरूपाच्या लाभदायक योजना, तसेच रोजगार निर्मिती करण्यात येणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश हा आदिवासी समुदायाचे सशक्तीकरण करणे हा आहे. या अभियानाअंतर्गत एकूण १७ विभागांमार्फत २५ प्रकारचे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. गाव पातळीवर विशेष ग्रामसभा आणि आदिवासी पारंपारिक नृत्य आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार काकडे यांनी दिली.

सदर अभियानात नायब तहसिलदार पुरवठा निलेश राउत, पुरवठा उपनिरीक्षक मिरसगावे,मंडल अधिकारी योगीता राठोड, मंडळ अधिकारी माहुर साळसुदंर सि.के.मंडल शिदखेड-पाइकराव, मंडळ अधिकारी वनिता चंदनकर, तलाठी साहेबराव गावंडे, तलाठी शितल ढाकुलकर, समता भडामे, अनिता कुडमते,महसुल सहाय्यक ममता गेडाम, नयना मेश्राम, तलाठी ओमप्रकाश तवर, अभिनीत कुडमते, प्रदीप कदम, राम ठाकरे, डी. यरडलावार,ग्रामसेवक टिपरसे यांचे सह संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# हदगावात भाजपा तर्फे संवाद बैठक



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२२ जून -**

देशाच्या यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत अमृत काळातील सेवा, सुशासन, गरीब कल्याणच्या ११ वर्षाच्या यशस्वी टप्पा पूर्ण झाल्याच्या निमित्ताने बुद्धजीवी संवाद बैठक संत रोहिदास सभाग्रहात आयोजित करण्यात आली होती. या संवाद बैठकीस नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष अॅड. किशोर देशमुख ,प्रमुख वक्ते म्हणून डॉ.माधवराव पाटील उच्चेकर तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर ज्यामध्ये डॉ. प्रदीप तावडे, नारायण कदम, अॅड. सचिन पांडे, बालाप्रसाद मुंदडा व निरंजन दहेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. माधवराव पाटील म्हणाले की, भारताच्या शेवटच्या घटकापर्यंत लोक जनकल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा हे हेतू समोर ठेवून प्रत्येक नागरिकांच्या बँक मध्ये जनधन योजनेद्वारे खाते करण्यात आले तसेच या अकरा वर्षाच्या कालावधीत भारताने उतुंग भरारी घेत जगात चौथा क्रमांक चार अर्थव्यवस्था वर झेप घेतली प्रत्येक क्षेत्रात भारताची चौफेर प्रगती चालू असून भविष्यात अशीच विकासाचा आलेख व गती वाढतच राहणार असल्याचे प्रतिपादन डॉ.माधवराव पाटील उच्चेकर यांनी केले .यावेळी प्रा. मिराशे, अॅड. सचिन पांडे ,डॉ. तावडे ,अॅड. वारकड यांची समायोजित भाषणे झाली व अध्यक्षीय भाषण अॅड. किशोर देशमुख यांनी केले. यावेळी आनंदराव भंडारे, तातेराव वाकोडे, भागवत देवसरकर, चंद्रशेखर कदम, शिरीष मनाठकर, सूर्यकांत हनवते, बापूराव घाडगे, सुप्रिया मुनेश्वर ,भाऊराव डोरले सर, संतोष कांबळे, उमाकांत भोरे, बाळू शंकुरवार, गजू लकडे उपस्थित होते तर आभार प्रदर्शन भाजपा तालुकाध्यक्ष बाळा पाटील यांनी केले.

# उमरी येथे जागतिक सिकलसेल दिन, जनजागृती पंधरवाडा व ग्रामदरबार मोहीम यशस्वी

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२२ जून -**

प्रतिवर्षी दि. १९ जून रोजी जागतिक सिकलसेल दिन साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व ग्रामीण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधी अंतर्गत सर्व उपकेंद्र राव धानोरा व उपकेंद्र तळेगाव या ठिकाणी मौजे चिंचाळा या ठिकाणी गटविकास अधिकारी व्ही. आर.अरबडवाड यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे उद्घाटन करून ग्राम दरबार कार्यक्रमाविषयी गटविकास अधिकारी यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाच्या वेळी गावातील सरपंच प्रतिनिधी अशोक कदम, विस्तार अधिकारी मोटरवार, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या संघटनेचे अध्यक्ष वनसागरे, पशुवैद्यकीय अधिकारी स्वप्नाली ढोक, आरोग्य विस्तार अधिकारी लता जाधव ग्रामपंचायत अधिकारी पुपुलवाड उपस्थित होते. यावेळी गावातील जनतेला सिकलसेल आजार विषयी तालुका सिकलसेल सहाय्यक राजू गायकवाड यांनी सखोल असे मार्गदर्शन केले. नंतर गावातील लाभार्थ्यांची सोल्युबिलिटी तपासणी करण्यात आली. व सोलुबिलिटी तपासणीत संशयित नमुन्यावी HLL दवारे HPL.C तपासणी करण्यात यावी. सदर अहवाल सिकलसेल पोर्टल वर आपलोड करण्यात यावे तसेच गावातील वयोगट ० ते ४० वयातील लाभार्थी या तपासणी पासून वंचित राहणार नाहीत सर्वांनी तपासणी करून घ्यावे असे संबोधित करण्यात आले. दुसरीकडे उपकेंद्र रावधानोरा येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. भारतभूषण गजभे, तालुका समूह संघटक एम.व्ही. तेले, आरोग्य सेविका लता तेलंग, उपकेंद्र तळेगाव येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. मोनिका गजभे, आरोग्य सेविका चंद्रकला उडतेवार, आशा स्वयंसेविका सलमा बेक ,विशाखा खंडेलोटे उपकेंद्रात सोलुबिलिटी तपासणी करण्यात आली .यावेळी गावातील आशा स्वयंसेविका राधाबाई सोनकांबळे व गावातील नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंचायत अधिकारी बैलकवाड व आभार पुपुलवाड यांनी केले.

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटींची कामे मंजूर

## खा.बजरंग सोनवणेंनी करून दाखविले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले सोनवणेंच्या पाठपुराव्याला पाठबळ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जून**



जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहूतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही महत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून धारुर घाटातील वाहतुक समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी होत होती. घाटामधे चढ जास्त असल्यामुळे जड वाहतुक लांबच्या मार्गाने करावी लागत होती. अरुंद रस्त्यामुळे घाटामधे अपघाताचे प्रमाण वाढले होते. हे काम पूर्ण झाल्यास शेगाव ते पंढरपूर रस्ता वाहतुक सुरळीत होईल. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्गात येणारे अडथळे आणि महत्वाच्या विषयाकडे लक्ष घातलेले आहे. धारूर घाटातील ब्लॅकस्पॉटवर अनेकदा अपघात होवून बळी गेलेले आहेत. परिणामी, अनेक संसार उघड्यावर पडलेले आहेत. आता याठिकाणी पर्यायी मार्ग काढून येथील अपघात टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहे.

**या कामांसाठीही सुरू आहेत प्रयत्न**

**अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल.**

**मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो.**

**-खा.बजरंग सोनवणे, बीड.**

## योग दिन उत्साहात साजरा

# ताण तणावापासून मुक्त राहण्यासाठी योगासने करणे महत्त्वाचे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जून**



धकाधकीच्या जीवनात ताणतणावातून तणावमुक्त राहण्यासाठी शारीरिक व मानसिक क्षमता कायम राहावी यासाठी दररोज योगासने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

योग हा पारंपारीक पद्धतीने पाच हजार वर्षापासून चालत आला असून पूर्वी वडीलधारी मंडळी योगाच्या माध्यमातून स्वतःला निरोगी व तणावमुक्त ठेवण्यासाठी योगासने, ध्यान साधना करत असत. विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी व एकाग्रता साधण्यासाठी ध्यान धारणा (मेडीस्टेशन) करणे ही काळाची गरज झाली असून शारिरीक व मानसिक स्वास्थ्य निरोगी ठेवण्यासाठी ध्यान साधनेचा जीवनात नियमित उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना केले.

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शिक्षण विभाग, विविध योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे इनडोअर हॉलमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योगदिनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येतो. माणसाच्या जीवनात योगाचे अत्यंत महत्त्व असून आजची आपली जीवनशैली बदलल्यामुळे तरूण पिढी नेहमीच तणावाच्या वातावरणात वावरत असते. यापासून मुक्त राहण्यासाठी योगासारखे दुसरे माध्यम नाही. प्रत्येक नागरीकांनी योगा केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी शाळा व महाविद्यालयातील तरूणाने योगा केला पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

योग दिनाचे औचित्य साधून बीड जिल्हयातील राष्ट्रीय खेळाडू राधा वझे, सुभाषिणी वझे, शिवाजी घोडके व राधा तांबे यांचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी योगगुरू विनायक वझे, विकास गवते, राधा तांबे यांनी उपस्थितांकडून योगासने करून घेतले. प्रोटोकॉल नुसार योगा कार्यक्रम संपन्न होत असतांनी शेवटी पूर्णवाद स्पोर्टस् ॲण्ड हेल्थ प्रमोशन अकॅडमी, बीड च्या योग खेळाडू यांनी व शिवाजी घोडके, राधा तांबे यांनी योग प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन केले.या योग दिनाच्या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वासुदेव सोळंके, निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तहसिलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जिल्हा कोषागार अधिकारी लहु गळगुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी माध्य. विभाग, संजय पंचगल्ले, प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग, भगवान फुलारी जिल्हा आयुष अधिकारी, आनंद कुलकर्णी, पुरूषोत्तम पिंगळे, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग रविंद्र तोंडे, जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा.जे.पी. शेळके, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, भगवान सोनवणे, रंगनाथ राऊत, सहाय्यक जिल्हा उपनिबंधक अशोक कदम, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, विविध कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी शहरातील शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, क्रीडा संघटक, नागरिक, खेळाडू, पत्रकार, व्यवसासिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.योग दिनाचे यशस्वी आयोजन होणे कामी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचे मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक, धनेश करांडे, प्रिती काळे, मंगेश वडमारे, गणेश वीर यांनी परिश्रम घेतले.

# शिवसेनेच्या वतीने मुक्ताबाई पालखी चे आदरातिथ्य






बीड : आषाढी वारी निम्मित श्री क्षेत्र मुक्ताईनगरहून पंढरपूर कडे मार्गस्थ असणाऱ्या संत मुक्ताबाईच्या पालखी चे आगमन रविवारी बीड शहरात झाले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पालखी चे स्वागत करून संस्थान चे विलास महाराज खोले यांच्या सह वारकऱ्यांचे आदरातिथ्य केले. यावेळी शिवसेनेचे सुशील पिंगळे, नवनाथ प्रभाळे, गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, बाळु वैद्य सह आदी.

# बीड व अंबेजोगाई येथील सैनिकी मुलांचे वसतीगृहामध्ये दिनांक १ जुलै २०२५ पासुन प्रवेश प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जून**

जिल्हयातील समस्त आजी-माजी सैनिक, युध्द विधवा यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता सैनिकी मुलांचे वसतीगृह बीड व अंबेजोगाई हे दिनांक ०१ जुलै २०२५ पासुन पुर्ण क्षमतेने सुरु होत आहे. सदरचे वसतीगृहामध्ये ज्या आजी-माजी सैनिक, युध्दविधवा, विधवांचे पाल्य बीड व अंबेजोगाई येथे शिकत आहेत त्यांना प्रवेश दिला जातो. सदर पाल्यांना अति अल्प दराने पदानुसार शुल्क आकारले जाते तसेच विधवांच्या मुलांना वसतीगृहामध्ये विनामुल्य प्रवेश दिला जातो. प्रवेशाकरीता प्रवेश पुस्तीका वसतीगृह अधिक्षक यांचे कडे उपलब्ध आहेत. तरी इच्छुक आजी-माजी सैनिक, युध्द विधवा, विधवा, इतर नागरीक पाल्यांनी वसतीगृहामधुन प्रवेया पुस्तीका खरेदी करुन आपले प्रवेश दिनांक ३० जुन २०२५ पर्यंत निश्चित करावे, असे आवाहन स्कॉड्रन लिडर विद्यासागर कोरडे (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बीड यांनी केले आहे. अधिक माहीती करीता वसतीगृह अधिक्षक बीड-९४२१६१६२२३, वसतीगृह अधिक्षक अंबेजोगाई- ९७८०८९७८८३, व ०२४४२-२२२१०५ या क्रंमांकावर संपर्क करावा.

# जगावं कसं ? यासाठी ज्ञानेश्वरी

भगवत गीतेतील भगवंताचे मार्गदर्शन केवळ एकट्या अर्जुनासाठी युद्धभूमीवर दिलेलं असलं तरी आपण सामान्य जणांची जेव्हा तशीच द्विधा मनस्थिती होते, काय करावं काय नाही? असा प्रश्न समोर उपस्थित होतो, तेव्हा तेच भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरते, ते ज्ञान ज्ञानेश्वर माऊलींनी सविस्तरपणे आणि सोप्या भाषेत ज्ञानेश्वरीतून सर्वांसाठी दिलेला आहे.

ओम नमोजी अदयाय या प्रास्ताविकेच्या प्रथम ओवीपासून हाज मधुकरराव वैद्य यांनी निरुपणाची सुरुवात केली. बीड शहरातील वाडिया वाचनालयातील सभागृहात ज्ञानेश्वरी अभ्यास मंडळाच्या वतीने हा कार्यक्रम दर बुधवारी सायंकाळी होत असतो.

ज्ञानेश्वर माऊलींनी भगवद्गीतेचे भाषांतर केलेले नाही पण जे तत्त्वज्ञान अर्जुनासाठी भगवंतांनी दिले ते अधिक सोप्या भाषेत सर्वांना समजेल असे मराठी भाषेतून बाराव्या शतकात मांडलेले आहे कारण त्या काळजी सांस्कृतिक आक्रमणे आणि सामाजिक समस्यावर मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे होते. चारही भावंडांनी लहान वयात जे सहन केलं, भोगले त्याचा लवलेशही कुठे मांडलेला दिसून येत नाही तर जगाच्या कल्याणाचा विचार समाज अस्तिक व्हावा, सन्मार्गाने चालावा यासाठी पसायदान सृष्टीच्या निर्मात्याकडे मागितलेले आहे. अशा माऊलीच्या ज्ञानेश्वरी वरील चिंतन- निरूपण -अभ्यास व्हावा यासाठी वाडिया वासनाला सुरू केलेला हा उपक्रम आजच्या काळातही खूप मौलिक आणि स्तुत्य वाटतो आहे. आजही आक्रमणे आणि सामाजिक स्थिती आणि द्विधा मनस्थितीत असलेला समाज आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सामान्य अर्जुन रुपी मनुष्याला आजही तितकाच मार्गदर्शक आहे. डॉ अनुराग पांगरीकर, डॉ.रोहिणीताई वैद्य, श्री विनायक महाराज पाटांगणकर यांच्यासह अनेक भाविक, अभ्यासक, धर्मप्रेमींची उपस्थिती आज होती. ग्रंथालय कर्मचारी आणि ग्रंथपाल गणेशराव शेंडगे यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

**माझं आकलन, शब्दांकन**
**प्रमोद कुलकर्णी (९४०३९०४६५१)**

# वरिष्ठ निवडश्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या खाती अर्जित रजा जमा करण्यात यावी- महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जून**

मराठवाडा विभागतील माध्यामिक व उच्च माध्यामिक शिक्षक दि ०२ जून ते १२ जून २०२५ या काळात वरिष्ठ व निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षणात सहभागी झाले होते या

वरिष्ठ निवडश्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या खाती अर्जित रजा जमा करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद करत आहे .

महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६ (१८) (अ) नुसार एखादा स्थायी कर्मचारी मोठ्या सु त्यांचाच हक्कदार असुनही एखाद्या वर्षात पुर्ण मोठ्या सुट्यांचा किंवा त्याच्या एखाद्या भागाचा लाभ घेण्यास प्रतिवर्षी झालेला असेल तर त्याबद्दल त्याला पुर्ण सुट्टीशी त्याने सुट्टीच्या न उपभोगलेल्या दिवसांच्या संख्येचे जे प्रमाण असेल त्या प्रमाणात वार्षिक ३० दिवसांच्या अर्जित रजेशी प्रमाणशीर असलेल्या संख्येएवढी अर्जित रजा अनुज्ञेय होईल अशी तरतुद आहे.

ज्या शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी/निवडश्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण (गृहपाठासह) पुर्ण केल्यामुळे त्यांना सुट्टी उपभोगण्यात प्रतिबंध झाला असेल त्यांच्या खाती अर्जित रजा जमा करण्याबाबत महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६ (१८) (अ) मधील वरील नियमानुसार कार्यवाही करावी. वरील नियमाने मराठवाडा विभागातील शिक्षक प्रशिकणार्थी या ना लाभ मिळण्यासाठी मा शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजी नगर यांनी तात्काळ परिपत्रक काढावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद मराठवाडा विभाग अध्यक्ष प्रा बाळासाहेब साळवे कार्यवाह सुरेश पठाडे संघटन मंत्री मधुकर कुलकर्णी उमाकांत कुलकर्णी ,विजय होपळे प्रा शशिकांत पसारकर प्रदीप पाटील नंदकुपार झरीकर गणेश पवार अनिल घायवट बाळासाहेब देशपांडे भगवान चाटे आदी पदाधिकारी यां नी केली आहे

# शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेशासाठी खेळाडूंनी २४ जून २०२५ पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जून**

महाराष्ट्रातील युवकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू म्हणून घडवण्यासाठी शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रांमध्ये सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी १९ वर्षांखालील पात्र खेळाडूंकरिता सरळ प्रवेश व कौशल्य चाचणीद्वारे निवासी प्रवेश दिला जाणार आहे.

राज्यातील विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रे अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद व पुणे या ठिकाणी शिवछत्रपती क्रीडापीठ पुणे अंतर्गत क्रीडा प्रबोधिनी प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वीत आहेत. सदर ठिकाणी नविन प्रशिक्षणार्थींची निवड करणे प्रस्तावित आहे.

क्रीडा प्रबोधिनीमध्ये समावेश असलेले खेळ प्रकारः आर्चरी, ज्युदो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, बॅडमिंटन, शुटिंग, कुस्ती, हॉकी, टेबल टेनिस, वेटलिफ्टींग, जिम्नॅस्टीक्स, जलतरण व फुटबॉल, ट्रायथलॉन, सायकलिंग अश्या १७ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते.

सरळ प्रवेश प्रक्रीयेद्वारा क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूंची तज्ञ समितीद्वारा चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे प्रवेश व क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी झालेले खेळाडूंना ज्याचे वय १९ वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या कौशल्य चाचणीचे आयोजन करून गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जाणार आहे. उपरोक्त चाचणीमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकांद्वारे चाचणी घेऊन कीडा प्रबोधिनीमध्ये शारीरिक दृष्ट्या सुदृढ खेळाडूंची निवड करण्यात येईल. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार हा १९ वर्षाखालील ज्या खेळाडूंचे वय १९ वर्षांपेक्षा कमी आहे म्हणजे ज्यांचा जन्म ०७ जुलै २००६ नंतर झाला आहे ते या प्रवेशासाठी पात्र असतील. कीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार खेळाडूकडे सहभागी झालेल्या राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड, जन्म प्रमाणपत्रासह अर्ज जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे दि. २४ जून २०२५ पुर्वी सादर करावे.

विभागस्तरावर चाचण्याचे आयोजन दि. २६ ते २७ जुन २०२५ या कालावधीत विभागीयस्तरावर होणार आहे, तरी बीड जिल्ह्यातील संबंधीत पात्र खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथुन अर्ज प्राप्त करुन घेऊन. आवश्यक कागदपत्रे दि. २४ जुन २०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यातील अर्जासोबत क्रीडा प्रमाणपत्र, आधारकार्ड, जन्म दाखला, इत्यादी माहिती सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी श्री. सतीश राठोड क्रीडा मार्गदर्शक ९९२३०१९३५३, श्री. अविनाश पाटील क्रीडा मार्गदर्शक - ९६२३७८११२१, श्री रेवननाथ शेलार, क्रीडा मार्गदर्शक ९०७५४७६७९१ यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# आधार मल्टीस्टेटकडून छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान

मान्यवरांना पुरस्कार, गुणवंतांचा गुणगौरव

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ जून**




येथील आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन व आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान, विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी दिली.

हा समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अंबाजोगाई येथे आधार मल्टीस्टेटच्या आधार भवन 'अजिंठा हॉल' मध्ये आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे 'डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सणा प्रमाणे साजरी करा असे का म्हटले होते' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ साहित्यिक तथा खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे हे भूषविणार आहेत. या समारंभात समाजसेवा पुरस्कार - ॲड.संतोष पवार (आधार माणुसकीचा), उत्कृष्ट प्रशासन अधिकारी पुरस्कार - दीपक वजाळे (उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई), विद्याभूषण पुरस्कार - कार्डिओलॉजिस्ट डॉ.दीपक कटारे (अंबाजोगाई, लातूर) , उद्योगभूषण पुरस्कार - प्रकाश प्रताप मर्लेचा (संचालक, प्रेरणा ड्रेसेस, अंबाजोगाई) यांना तर उत्कृष्ट साहित्य पुरस्कार - प्रा.डॉ.देविदास खोडेवाड (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई) या मान्यवरांना जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांचे वितरण ही गुरूवार दिनांक २६ जुन रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांच्या हस्ते केले जाणार आहे. अशी माहिती चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी दिली. आधार मल्टीस्टेट ही सहकार क्षेत्रातील काम करणारी अग्रगण्य संस्था आहे. ही केवळ अर्थ सेवा करीत नसून अर्थ क्षेत्रा बरोबरच समाजसेवेचे व्रत ही या संस्थेने अंगीकारले आहे.